१२५८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. १०९८०.

# साहित्यिकांशी हितगुज

विनोबा

REFBK-0009279

[illegible] विद्यापीठ प्रकाशन.

# साहित्यिकांशीं हितगुज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 22378 वि:
क्रमांक .. 7080 . नों: दि:

[ विनोबा ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ९२७८
शाखा (स्थळप्रत)

REFBK-0009279

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

प्रकाशक :—

भाऊ पानसे

ग्राम सेवा मंडळ

परंधाम विद्यापीठ

पो. पवनार ( वर्धा )

आवृत्ति पहिली ५०००

२२ मार्च १९५७

किमत : दहा आणे

मुद्रक :—

मोहनलाल भट्ट,

राष्ट्रभाषा प्रेस,

हिन्दीनगर, वर्धा

# प्रकाशकीय

एखादें राष्ट्रव्यापी आंदोलन जेव्हां सुरू होतें तेव्हां देशांतील कवि, लेखक आणि साहित्यिक यांना हि स्वाभाविक स्फूर्ति चढत असते. गांवोगांव आणि खेडोपाडीं सामूहिक उठावणी होण्यामधें या सारस्वताचा फार च मोठा हिस्सा असतो हें स्वातंत्र्यलढ्याच्या वेळीं आपण पाहिलें च आहे.

विचार-प्रचारावरील विनोबांची निःसीम निष्ठा सर्वविदित च आहे. साहित्यिकांना स्फूर्ति वाटावी असें हें आंदोलन असल्यामुळें त्यांनी आपल्या बाजूनें जन-जागृति करण्यांत योग द्यावा असें विनोबांचें म्हणणें आहे. म्हणून च प्रत्येक प्रांतांतील साहित्यिकांशीं विनोबांची मुद्दाम भेट घडवून आणण्यांत येत असते.

हें "हितगुज" त्या च भेटींचें फळ आहे. उत्तर प्रदेश, बिहार, आणि, बंगाल येथील साहित्यिकांसमोर झालेल्या भाषणांशिवाय साहित्याची मीमांसा करणाऱ्या दोन मूळ मराठी प्रस्तावना हि प्रकरण ९ आणि १० मध्यें दिल्या आहेत. या प्रस्तावना अनुक्रमें श्री. माटे यांच्या "देवदूत" ला आणि श्री. कोलते यांच्या "जीवन-गंगे"ला दिलेल्या आहेत.

"साहित्यिकोंसे" या नांवानें मूळ हिंदींत हें पुस्तक सर्व सेवा संघानें या पूर्वीं च प्रसिद्ध केलें होतें. त्याचें हें मराठी रूपांतर आहे.

# साहित्यिकांशीं हितगुज

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | वागीश्वरानें वाग्दान द्यावें | १ |
| २ | साहित्यिकांचें लक्षण : प्रेमळ हृदय | ६ |
| ३ | भूदान-यात्रेचें आमंत्रण | ११ |
| ४ | साहित्यिकांचा मौलिक गुण : खरेपणा | १८ |
| ५ | साहित्यिक ईश्वराहून उंच | २७ |
| ६ | साहित्यिकाला एक ठिणगी च पुरे | ३७ |
| ७ | हृदयाशीं हृदय जोडा | ५२ |
| ८ | साहित्यिकांच्या उपजीविकेचा प्रश्न | ६५ |
| ९ | विदग्ध वाङ्मय | ७१ |
| १० | काव्य सत्याचा एक प्रयोग | ७५ |
| ११ | **परिशिष्ट प्रश्नोत्तरें** | ७९ ते ८७ |
| | १ साहित्यांत शृंगाराची मर्यादा | ७९ |
| | २ भूदान आणि साहित्यकार | ८१ |
| | ३ साहित्यसेवी महिला आणि सेवा-कार्य | ८१ |
| | ४ साहित्याच्या द्वारें चरितार्थ साधन | ८२ |
| | ५ दक्षिणेकडील एक भाषा शिका | ८३ |
| | ६ भूमिक्रांतीची मूर्ति | ८५ |
| | ७ 'दान' शब्द कां वापरता ? | ८६ |
| १२ | साहित्यिकांचें देशाला आवाहन | ८८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 22398 दि. 1.7.9...
नों: दि: ...

# साहित्यिकांशीं हितगुज

: १ :

## वागीश्वरानें वाग्दान द्यावें

तुम्हीं सर्व साहित्यिक म्हणून येथें आलां आहांत. माझें साहित्यावर प्रेम असलें तरी माझी गणना साहित्यिकांमधें नाहीं. तथापि साहित्याचा जो अर्थ मी समजलों आहें तो आपल्यापुढें मांडीत आहें.

'साहित्य' हा शब्द च सांगतो कीं ती निरपेक्ष वस्तु नाहीं. ती कोणाच्या तरी 'सह' जाणारी वस्तु आहे. जीवन-निष्ठेचें प्रकाशन करणें हें साहित्याचें ध्येय आहे. जीवन-निष्ठा आणि साहित्य दोन्ही एकरूप झालीं पाहिजेत. कालिदासानें वाणी आणि अर्थ यांना पार्वती आणि परमेश्वर यांची उपमा दिली आहे. अर्थ म्हणजे जीवन, आणि वाणी म्हणजे साहित्य. हीं दोन्ही एकमेकां-शिवाय राहूं शकत नाहींत. वाणीमुळें जीवनाची प्रभा फांकते. त्यांचा संबंध सूर्य आणि किरण यांसारखा आहे. दोन्ही अभिन्न असले तरी प्रचारकाचें काम किरण च करतात. साहित्य जीवनाच्या प्रभेच्या रूपानें प्रकट होतें.

राष्ट्राबरोबर च साहित्याची हि उन्नति किंवा अवनति होत असते. त्याप्रमाणें साहित्य जीवनाला हि उन्नत किंवा अवनत करूं शकतें. जीवन आणि साहित्य यांना उन्नत करणारीं दोन उदाहरणें आपण पाहिलीं आहेत.

पहिलें उदाहरण गांधीजींचें. गांधीजी साहित्यिक मानले जात नव्हते. तरी हि त्यांच्या प्रभावानें हिंदुस्थानच्या प्रत्येक भाषेचें साहित्य उन्नत झालें आहे.

दुसरें उदाहरण रवीन्द्रनाथ टागोरांचें. त्यांची सद्भावना आणि विश्ववृत्ति यांमुळें समाज उन्नत झाला. कवि महात्मे असले तर त्यांचा प्रभाव जीवनावर पडतो.

### साहित्य आणि सत्य एकत्र

कांहीं अशीं हि उदाहरणें आहेत कीं, जेथें साहित्य आणि सत्य एकत्र असलेलीं दिसून येतात. महर्षि व्यास हें त्याचें उदाहरण आहे. ते शब्द-निष्णात होते, व्यवहारज्ञ होते; कर्मयोगी होते, आणि समाजावर आपत्ति आली असतां धावून जाणारे होते. अशा प्रकारचीं दुसरीं हि उदाहरणें आहेत. शंकराचार्य असे च होते. त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले; त्यांत कांहीं तत्त्वज्ञानपर आहेत, कांहीं भक्तिपर आहेत आणि कांहीं सर्वसाधारण लोकांसाठीं आहेत. शंकराचार्य एक महान् कर्मयोगी देखील होते.

### राम आणि वाल्मीकि

परंतु एका च व्यक्तीमधें दोन्ही गुण एकत्र असावेत हा एक विशेष ईश्वरी प्रसाद आहे. सामान्यतः एक च गुण असणारे लोक अधिक असतात. ते परस्परांचे पोषक असले तर विशेष च म्हणावयाचें. वाल्मीकीनें रामायण लिहिलें. परंतु रामचंद्र नसते

तर वाल्मीकि झाले नसते आणि वाल्मीकि नसते तर रामचंद्र झाले नसते.

### महान् प्रभावशाली शब्द

पावन, मंगल आणि शांतिदायी त्या च प्रमाणें समाजाला तुष्टि आणि पुष्टि देणारे शब्द च आपण साहित्यांत वापराल अशी मी आशा राखतों. विचार केल्यास आपल्या हि ध्यानांत येईल कीं, जो मनुष्य तपस्वी नसतो, चिंतनशील नसतो त्याच्या हृदयांत महान् शब्द स्फुरत च नाहींत. ऋषि महान् कर्मयोगी भले नसो, परंतु तो जर जीवन-निष्ठ असेल तर त्याचे शब्द प्रेरणा देतील. कधीं कधीं सामान्य लोकांना हि महान् शब्द स्फुरतात, परंतु ते त्यांच्या हृदयांत टिकत नाहींत. पण ऋषींच्या मुखांतून निघणारे शब्द गंगोत्रीसारखे असतात. त्यांतून गंगा निर्माण होते. सामान्य लोकांच्या शब्दांचा छोटासा झरा च राहतो.

### सौहार्दपूर्ण शब्द

सर्व समाज सौहार्दानें, प्रेमानें भरलेला असावा अशी माझी इच्छा आहे. मी त्या कामीं केवळ निमित्तमात्र आहें. समाजामधें तऱ्हेतऱ्हेचे भेद आहेत. परंतु लोकांत जर सौहार्द असेल, प्रेम असेल, तर त्या विविधतेंतून हि एक सुरेल संगीत निर्माण होईल. भेदाविरुद्ध माझा प्रचार चालू असला तरी मी विविधता नष्ट करूं इच्छीत नाहीं. विविधता नाहींशी झाली तर जीवन च नीरस बनेल. 'वर्ग-विरोध' 'संघर्ष' इत्यादि शब्दांहून वेगळे च शब्द मी वापरीत असतों, परमेश्वरानें जीं पंचमहाभूतें, पंचतत्त्वें, निर्माण केलीं आहेत तीं एकरस आहेत असें मी मानतों. त्यांमधें कुठें वर्गभेद मला दिसत नाहीं.

## ‘भूदान’ शब्द

सौहार्दाचा शोध करीत असतां ‘भूदान’ शब्द माझ्या हातीं आला. आणि तो चांगला रूढ होत आहे. आतां च एकानें सांगितलें कीं ‘भूदान’ शब्दानें प्रत्येकाच्या अंतःकरणांत सहानुभूति उत्पन्न होते. परमेश्वराच्या कृपेनें मला हा असा शब्द मिळाला कीं, ज्यानें अनेकांना समान भूमिकेवर आणलें आहे. भूदानाच्या योगानें शांतिवादी आणि क्रांतिवादी एकत्र येत आहेत. काळी यमुना आणि धवल गंगा जिथें मिळतात तिथें च प्रयागचा संगम होतो. भूदान-यज्ञ देखील प्रयागासारखा संगमात्मक कार्यक्रम बनूं लागला आहे. त्यांत प्राचीन आणि अर्वाचीन सभ्यतांचा हि संगम आहे.

तुम्ही या कामीं मला मदत करावी हें मला सांगायचें आहे. तुमच्यापैकीं कोणाजवळ थोडी कां जमीन असेना तरी त्यांतला कांहीं हिस्सा मला द्या. मी घ्यायला निघालों आहें. हा सारा नवा च कार्यक्रम आहे. आज चारी बाजूला आपण ‘घेण्याच्या’ गोष्टी च ऐकत आहोंत. अशा वेळीं मी ‘देण्याच्या’ गोष्टी ऐकवीत आहें.

## वाग्दान द्या

मीं विदर्भ-साहित्य-संमेलनाला “वाग्दान द्या”. असा संदेश पाठविला होता. ती च मागणी मी तुमच्याकडे हि करीत आहें. राष्ट्रकवि मैथिलीशरण यांनीं भूदानासंबंधीं अत्यंत प्रभावशाली शब्द-रचना केली आहे. माझ्या आवाहनानंतर इतर हि कित्येक सहृदय कवींना स्फूर्ति मिळाली आहे.

“**भूमिदान-यज्ञ हम सफल बनायेंगे**” असें जेव्हां एखादा कवि म्हणतो तेव्हां त्या शब्दांचा जनतेवर फार खोल परिणाम

होतो. लोक जेव्हां हें गाणें म्हणतात तेव्हां नवीन युगाचा उदय होत असल्याचें स्पष्ट दिसूं लागतें.

## जागृत करणारे शब्द

कांहीं लोक सूर्योदयामुळें जागे होतात, कांहीं लोक पक्ष्यांची किलबिल ऐकून जागे होतात. तसें लोकांना जागें करण्याची शक्ति वाणींत म्हणजे च साहित्यांत--सारस्वतांत--असते. त्या शक्तीचा उपयोग मी तुमच्याकडून अपेक्षितों.

## दुर्बळ अवजार

मीं हें काम अत्यंत नम्रतापूर्वक सुरू केलें आहे. या कामासाठीं माझ्याहून अधिक बलवान वाहन जगांत नाहीं, असें मी मानीत नाहीं. परंतु ईश्वराची योजना अशी विचित्र आणि नाटकी आहे कीं, त्यानें कृष्णावतारांत गवळ्यांच्या पोरांकडून आणि रामावतारांत वानरांकडून काम करून घेतलें त्या प्रमाणें च माझ्यासारख्या क्षूद्र माणसाकडून तो आज काम करून घेत आहे. शब्द-शक्ति इत्यादि तो च मला देईल. या कामाकरतां मी एक दुर्बल अवजार आहें. या गोष्टीचें मला चांगलें भान आहे.

## निरहंकार बनण्याचा प्रयत्न

मी माझी योग्यता बदलूं शकेन असें मला वाटत नाहीं. गाढवाला घोडा बनण्याची इच्छा असली तरी तो घोडा होऊं शकत नाहीं. परंतु जर अहंकार सोडला तर क्षुद्र वस्तु देखील शक्तिशाली बनूं शकते; हें मी जाणतों. बांबूच्या पोकळ नळीप्रमाणें आम्ही जर अहंकार-शून्य बनलों तर परमेश्वर आम्हांला हातीं घेऊन आमची मुरली बनवून वाजवील. परंतु निरहंकार बनणें सोपें काम नाहीं. तथापि शक्तिशाली बनण्यापेक्षां तें कमी कठिण आहे.

म्हणून अहंकार सोडून, सर्वांना परमेश्वर-स्वरूप समजून, त्यांच्या-कडून दान मागावें असें मीं ठरविलें आहे.

मी वाग्वीरांकडून वाग्दानाची मागणी करीत आहें.

---

: २ :

# साहित्यिकांचें लक्षण : प्रेमळ हृदय

**चिंतनशील ब्रह्मर्षि**

चिंतन ही एक शक्ति आहे. ती आत्म्याच्या अंतरांत शिरून आणि विश्वाच्या सूक्ष्मतेंत प्रवेश करून, जीवनाच्या सिद्धांतांचा शोध करते. या चिंतन-शक्तीच्या अभावीं समाज लुळा बनतो, प्रगति थांबते. भौतिक किंवा वैज्ञानिक संशोधनासाठीं ज्याप्रमाणें एकान्त-चिंतनाची आवश्यकता असते त्याप्रमाणें मनोविज्ञानाच्या संशोधनासाठीं देखील एकांत-सेवन करावें लागतें. अशा एकांतामधून देखील ब्रह्मर्षि जगापुढें जीवनाच्या तत्त्वज्ञानाचें चिंतनात्मक सार ठेवीत असतात. त्यांत च जीवनांतील प्रश्नांचा उकल असतो.

**समाज सेवक राजर्षि**

दुसरी शक्ति सेवेची असते. ब्रह्मर्षींकडून मिळालेल्या चिंतन-शक्तीच्या आधारें समाज-सेवक लोकसेवेंत मग्न असतात. यांना 'राजर्षि' म्हणतात. सेवा करणारे असे सेवक जर समाजांत असणार नाहींत तर समाजाचें एक अंग क्षीण होईल. एवढें च नव्हें तर सारा समाज शुष्क बनून जाईल.

समाजसेवा करणारे हे विचारक समाजांत आपला आवाज उठवितात. चळवळीची गरज वाटली तर चळवळ उभी करतात, संघटनेची जरूर असली तर संघटना उभी करतात, आणि लोकाग्रहास्तव सत्ता हातीं घेण्याची जरूर पडली तर सत्ता हि ग्रहण करतात. सत्ता ग्रहण करणारे हे लोक केवळ सेवा-परायण असतात. त्यांना स्वतःचा स्वार्थ असत नाहीं. एकीकडे ब्रह्मर्षींकडून ते विचार ग्रहण करतात आणि दुसरीकडे समाजसेवेच्या क्षेत्रांत त्यांचा अंमल करतात. जुन्या परिभाषेंत यांना च 'राजर्षि' म्हणतात. ज्ञानपूर्वक लोक-रंजन करीत लोक-सेवेंत मग्न असणारे राजर्षि ही समाजाची एक मोठी शक्ति असते.

## निर्विकार, कुशल साहित्यिक देवर्षि

तिसरी शक्ति साहित्याची आहे. ज्या विचारांचा ज्ञानी पुरुषांना अनुभव येतो आणि जे अंतरात्म्यांत सिद्ध झालेले असतात, असे विचार ज्ञानी पुरुष निवडक शब्दांत प्रकट करीत असतात. लोकवाणीमधें ते लोकांना ग्रहण व्हावेत यासाठीं विचारांची नीट ओळख तर करून घ्यावी च लागते, परंतु त्या विचारांना वाणीचा पोषाख चढवावा लागतो. अन्यथा योग्य शब्दांच्या अभावीं प्रकाशाऐवजीं अप्रकाश च व्हायचा. विचार खोल अंतःकरणांत असतो. तो जेव्हां आम्ही प्रकट करूं पाहतों तेव्हां कोण्या तरी शब्दाचें साहाय्य घ्यावें लागतें. अशा वेळीं कांहीं तरी न्यूनता राहून गेल्याची जाणीव होते. दुसरा शब्द वापरावा तर अतिरिक्त भाव प्रकट होण्याचा संभव असतो. दोन्ही शब्द वापरावे तर तिसरा च विपरीत भाव प्रकट होण्याची धास्ती असते. म्हणून प्रत्येक शब्दासंबंधीं विवेक करावा लागतो. आपल्या शब्दानें न्यून भाव प्रकट होऊं नये, अतिरिक्त भाव प्रकट होऊं नये आणि विपरीत हि भाव प्रकट

होऊं नये, अशी काळजी घ्यावी लागते. या त्रिविध दोषांना टाळून विचार अगदीं जशाचा तसा प्रकट करतां आला पाहिजे. जनतेच्या हृदयापर्यंत विचार पोहोंचविण्याच्या कुशलतेची ही तिसरी शक्ति ज्यांच्यांत असते त्यांना 'देवर्षि' म्हणतात.

ब्रह्मर्षींचें उदाहरण द्यायचें तर वसिष्ठ, याज्ञवल्क्य यांचीं नांवें घेतां येतील. देवर्षींमधें नारद तर प्रसिद्ध च आहेत. राजर्षींमधें निरंतर जनसेवेंत तन्मय असलेले जनकमहाराज सुप्रसिद्ध आहेत. असे पुरुष राजे च असले पाहिजेत असें नव्हे. ते सेवेमधें लीन असले कीं झालें.

**साहित्यिकांच्या साधनेचा मार्ग**

अशा रीतीनें साहित्यिकांना लोक-हृदयाला अनुकूल असे परिपूर्ण शब्द प्रकट करण्याची कुशलता साधली पाहिजे. न्यून, अतिरिक्त आणि विपरीत, भाव प्रकट न होणारी सम्यक्, मधुर आणि कुशल तिन्ही प्रकारची वाणी बोलतां येणें ही एक महान् साधना आहे. ज्याच्या चित्तांत स्वतःचा विकार असत नाहीं, अशा पुरुषाला च ही साधना साधते. ज्याच्या चित्तांत विकार असतो तो अशी सम्यक् वाणी प्रकट करूं शकत नाहीं. थर्मामिटरला स्वतःला ताप नसतो म्हणून तो दुसऱ्यांचा ताप मापूं शकतो. ज्याला स्वतःला ताप आहे तो दुसऱ्याचा ताप कसा मापणार ? त्याप्रमाणें स्वतःच्या चित्तांत विकार नसलेला मनुष्य च सम्यक् वाणी प्रकट करूं शकतो. विकारी मनुष्य निर्विकार विचार प्रकट करूं शकत नाहीं.

**तीन ऋषींचीं तीन महान् लक्षणें**

नारद देव, दानव, मानव सर्व लोकांत हिंडत. सर्वांना भेटत. ज्याच्या चित्तांत उत्तम भक्ति असते त्याला वाक्प्रचाराची दिव्य

शक्ति प्राप्त होते. ज्याप्रमाणें चिंतन-शक्ति हें ब्रह्मर्षींचें लक्षण, निरहंकार सेवा-भावना हें राजर्षींचें लक्षण त्याप्रमाणें सर्वांबद्दल अंत:करणांत प्रेम; हें देवर्षींचें लक्षण आहे. सर्वांचे विचार पारखण्यासाठीं बुद्धीची तटस्थता, वाणीची निर्विकारता आणि स्वत:ची निरहंकारता लागते. सूक्ष्म बुद्धीनें मनन करून जेव्हां वाणीचा उपयोग केला जातो तेव्हां सर्व प्रकारची शोभा ऐश्वर्य, वैभव, सौंदर्य आणि आनंद यांची वृद्धि होते.

### साहित्य शक्तीचा झरा

परंतु ज्या देशांचे लोक असम्यक् वाणी प्रकट करतात, मनांत आलें तें लिहून टाकतात, संपादक बनले आहेत म्हणून कसला हि मजकूर शीघ्र प्रकाशित करूं पाहतात, कसें हि करून फक्त कॉलम भरण्याची आपली जबाबदारी मानतात, काळ किंवा स्थळ यांची कांहीं च मर्यादा ओळखीत नाहींत त्या देशांत लक्ष्मी स्वप्नवत् समजावी. मनन करायला फुरसत मिळाली नसेल तर एक कॉलम कोरा ठेवतां येतो. हें मी सर्वसाधारण बोलत आहें. एकूण पाहतां हिंदुस्थानांतील बरेचसे पत्रकार विवेकी आहेत हें मी जाणतों. आपल्या येथील शिक्षणाचा दर्जा ध्यानांत घेतां आमचे पत्रकार पुष्कळ संयम ठेवतात असें च म्हटलें पाहिजे. आमच्या संस्कृतींत च संयम आहे. रघुवंशांत म्हटलें आहे 'सत्ययुक्त आणि मननयुक्त, वाणी जर नेहमीं मधुर, लोक-सुलभ आणि लोक-ग्राही असेल तर तिच्यांतून मोठी शक्ति प्रकट होऊं शकते.

आपल्या येथील साहित्यांत जे सद्विचार जशा रीतीनें प्रकट झाले आहेत तसे क्वचित च दुसऱ्या देशांत प्रकट झाले असतील. ह्या देशांत ब्रह्मविचाराचें मनन झालें. येथें जनक आणि अशोक यांसारखे महान् सेवक होऊन गेले. येथें व्यास वाल्मीकि आणि

शुक यांच्यासारखे अद्वितीय कवि आणि विचारक निर्माण झाले, आणि त्यांची परंपरा येथें चालू राहिली, त्यांचा संदेश अनेक भाषांमधें प्रकट झाला आहे. एक फार मोठा आदर्श त्यांनीं आपल्यापुढें ठेवला आहे.

## साहित्यिकांना विनंति

आज आपल्यापुढें ज्या समस्या आहेत त्या लहान नाहींत; आणि आमच्या देशाला जी संधि मिळाली आहे ती हि लहान नाहीं. आपल्या देशानें एका वेगळ्या च मार्गानें स्वातंत्र्य प्राप्त केलें म्हणून जगांतले सर्व देश आपल्या देशाकडे एका विशेष आशेनें पाहत आहेत. ही गोष्ट लक्षांत ठेवून जर येथील साहित्यिक चिंतन करतील तर ते फार मोठी सेवा करूं शकतील. ह्या काळांत हि आमच्या देशानें अरविंद घोष यांच्यासारखे ब्रह्मर्षि, रवीन्द्रनाथ ठाकुर यांच्यासारखे देवर्षि, आणि गांधीजींच्या सारखे राजर्षि निर्माण केले. हे महान् आदर्श आमच्यासमोर आहेत. ते ध्यानांत ठेवून देशाची प्रतिष्ठा वाढेल अशा प्रकारे आमचे साहित्यिक साहित्य-सेवा करतील अशी मला आशा आहे. मी हा विषय वाढवूं इच्छित नाहीं. फार मोठी शक्ति आमच्याजवळ आहे. क्षेत्र हि तसें च मोठें आहे. आमच्या अंत:करणांत आत्मा आहे. बाहेर हें सर्व विश्व-रूप आहे. घराच्या उंबरठ्याप्रमाणें वाणी या दोहोंमधें उभी आहे. नदीच्या दोन्ही किनाऱ्यांना जोडणाऱ्या पुलासारखी ती आहे. म्हणून आम्ही योग्य वाणी प्रकट करूं तर ह्या वाणीनें साऱ्या जगाला शोभा येईल, सारें जग प्रकाशित होईल आणि साऱ्या जगाची सेवा होईल. आपण अशी शक्ति मिळविली पाहिजे.

काशी विद्यापीठ
१३-७-५२

अनुक्रम ... दि. ...
क्रमांक : ... नों: दि: ...

# भूदान-यात्रेचें आमंत्रण

मी स्वतःला साहित्यिक समजत नसलों तरी साहित्याविषयीं माझ्या मनांत प्रेम आहे. आणि परमेश्वरानें मला हिंदुस्थानांतल्या सर्व भाषांतील आणि प्राचीन भाषेंतील साहित्याशीं परिचय करून घेण्याची संधि दिली आहे. मीं त्यांचें खोल अध्ययन केलें असें जरी म्हणूं शकत नाहीं तरी आत्मसंतोषासाठीं म्हणून मीं आपलें काम करीत असतां थोडें अध्ययन केलें आहे. थेट वेदकालापासून आज-पर्यंतचा जो विचार-प्रवाह आहे त्याच्याशीं शब्द-दृष्टया नव्हे परंतु विचार-दृष्टया मी परिचित आहें. त्या विचार-प्रवाहांतील सद्वस्तूं-बद्दल मला प्रेम आहे. पाश्चात्य साहित्य हि मीं वाचलें आहे.

## दोन प्रकारचें साहित्य

मी साहित्यिक नाहीं हें आधीं सांगितलें च पाहिजे. तुमच्या-पुढील माझें हें व्याख्यान कार्यपरत्वें च आहे. हें व्याख्यान अहेतुक नसून सहेतुक आहे. कदाचित् साहित्य हेतुयुक्त असूं शकेल तसें हेतुरहित हि असूं शकेल. भगवद्गीतेनें दोन प्रकारच्या साहित्याचा उल्लेख केला आहे. एक प्रकार असा कीं स्फूर्ति झाली आणि मुखावाटें सूक्तांच्या रूपानें वेद प्रकट झाले. हें हेतुरहित साहित्य म्हणतां येईल. दुसरा प्रकार हेतुयुक्त साहित्याचा.

## साहित्यिक देवर्षि असतात

साहित्यिक असल्याचा माझा दावा नसला तरी मी जें बोलतों आणि करतों त्यांत सदिच्छा आणि सद्भाव असल्यामुळें त्याची

चांगल्या साहित्यांत गणना होऊं शकते. साहित्यिकांविषयीं माझ्या मनांत प्रेम आहे. आणि त्यांची हि माझ्यावर कृपा आहे. मी त्यांची कदर करतों. सामाजिक जीवनांत साहित्यिकांचें स्थान उच्च आहे असें मी मानतों. म्हणून च त्यांना मीं देवर्षि म्हटलें.

**सहज प्रेरणा**

साहित्य आत्म-हेतूसाठीं असतें; परमेश्वरासाठीं असतें तसें च अहेतुक हि असूं शकतें. साहित्यिकांना बोलल्याशिवाय आणि लिहिल्याशिवाय राहवत नाहीं; अशी स्थिति असते. जशी गंगा सहज वाहत असते, सूर्य सहज प्रकाश देत असतो, तशी त्यांना सहज प्रेरणा मिळत असते, अंत:स्फूर्ति होत असते. आपण प्रकाश देत आहों, याचें जसें सूर्याला भान नसतें तसें देवर्षि स्वभावत: च बोलत असतात, रडत असतात. ते हेतुपूर्वक बोलले तरी गातील. म्हणून साहित्यिकांचें जीवनांत फार उच्च स्थान आहे.

**अज्ञात देवर्षि**

या काळांत हि असे देवर्षि झाले आहेत. उदाहरणार्थ रविबाबू. परंतु जे मोठे आणि प्रसिद्ध असतात ते च उत्तम साहित्यिक असतात असें नव्हे. ते तर चांगले असतात च, परंतु ज्यांना लोक ओळखत नाहींत असे साहित्यिक त्यांच्याहूत श्रेष्ठ असतात. सूर्याचीं सात किरणें आम्ही जाणतों परंतु सूर्याचीं 'अल्ट्राव्हॉयोलेट' आणि 'इंफ्रारेड' सारखीं किरणें आम्ही पाहूं शकत नसलों तरी त्यांचा लाभ आपल्याला मिळतो. सूर्याच्या प्रकट किरणांपेक्षां त्याचे अप्रकट किरण अधिक उपकारक असतात. म्हणून जगाला ज्यांची ओळख आहे त्यांच्यापेक्षां ज्यांना जग जाणत नाहीं ते अधिक महान् असतात. भगवान् बुद्ध, येशू ख्रिस्त आदि महान् व्यक्तींचा महिमा जग गातें. ते मोठे होते यांत शंका च नाहीं.

परंतु त्यांचे हि जे गुरु होते, त्यांची जगाला ओळख नाहीं. आम्ही त्यांची योग्यता मापूं शकत नाहीं, कारण आम्हांला ते माहीत च नाहींत. परंतु ते होऊन गेले नक्की. त्याच्या संकल्पामधें च एवढी मोठी शक्ति होती कीं त्या संकल्पबलानें च कामें झालीं. कधीं-कधीं अव्यक्तरूपानें ते संकल्प आपल्याला प्रेरणा देतात आणि आमच्या कामाला वेग देतात. कोठून वेग मिळतो तें आपल्याला कळत नाहीं. कारण ते अव्यक्तरूपानें काम करीत असतात. असे लोक जगामधें अधिक महान् आणि उच्च कोटीचे असतात.

**विन्यानें दगड फोडला**

लहानपणची एक गोष्ट मला आठवते. आमच्या घरीं दगड फोडायचें काम चाललें होतें. मी तें पहायला जात असे. केव्हां केव्हां मी त्यांना म्हणे, "मला हि दगड फोडायचा आहे." तेव्हां ते लोक अगदीं फुटायला आलेला दगड फोडायला देत. मीं आपल्या लहानशा हातोडीनें त्यावर घाव मारतां च तो फुटून जाई, लोक म्हणत, 'विन्यानें दगड फोडला' तसें आहे. ज्यांचें नांव जगाला माहीत नाहीं असे लोक सूक्ष्म अवस्थेमधें राहतात. चिंतन, मनन करणें आणि त्यानुसार जीवन घालविणें हें च त्यांचें काम असतें. त्यांची महत्ता आम्ही ओळखीत नाहीं. परंतु ते विचार इतका प्रगत करून ठेवतात कीं त्याच्या आधारें पुढें जगांत दुसरे लोक ते विचार प्रसिद्ध करतात. शंकराचार्यांचें नांव जगाला माहीत आहे. जग त्यांना महान् अद्वैत-वादी मानतें. परंतु अद्वैतामधें ते पोर होते. त्यांच्या आधीं कितीतरी महान् अद्वैती होऊन गेले; ज्यांचें नांव हि जगाला माहीत नाहीं. नांव मात्र, विन्याच्या दगड फोडण्याप्रमाणें, शंकराचार्यांचें झालें.

## पायांतले दगड

“रघुपति-कीरति विमल पताका । दंडसमान भयउ जस जाका।” असें लक्ष्मणाचें वर्णन तुलसीदासजींनीं रामायणामध्यें केलें आहे. रघुपतींची विमल पताका सर्वांना दिसते. परंतु तिचा आधार लक्ष्मण होता. ‘**झंडा ऊंचा रहे हमारा**’ असें आम्ही म्हणतों. ‘दंडा उंचा रहे’ असें कोणी म्हणत नाहीं. परंतु काठीशिवाय झेंडा उंच राहूं शकत नाहीं. नांव झेंड्याचें होतें काठीचें नाहीं. लक्ष्मण काठीसारखा ताठ उभा होता. कधीं वाकला नाहीं. तुलसीदासांनीं त्याच्या यशाचा महिमा ओळखून प्रकट केला. लक्ष्मण स्वत:ला रामाहून मोठा मानीत नव्हता. परंतु राम मात्र त्याला मोठा मानीत होते. ते म्हणत, “तूं नसतास तर माझें काम कसें झालें असतें?” लक्ष्मणाला बाण लागून तो बेशुद्ध पडला, तेव्हां “आतां माझें कसें होईल” असें म्हणून राम रडूं लागले, असें वर्णन केलें आहे. वास्तविक सारी लीला त्यांची च होती. लक्ष्मण त्यांच्या लीलेचा च एक भाग होता. म्हणून ती तुलना इथें लागू होत नाहीं. तथापि अशीं उदाहरणें पहावयास मिळतात. पाया कोणाला दिसत नाहीं. सारे लोक वरचें घर पाहतात. परंतु पायांतल्या दगडांचें खास महत्त्व असतें. परंतु घर पाहून “घराचा पाया किती चांगला आहे!” असें कोणी म्हणत नाहीं. आतां एखादी पांचशें वर्षांची जुनी इमारत पाहिली तर कदाचित् लोकांचें पायाकडे लक्ष जाईल. पण आज मात्र वरची च इमारत पाहिली जाते. ज्यांचीं नांवें आम्ही जाणतों ते काजवे होत. परंतु ज्यांचीं नांवें आम्हांला माहीत नाहींत ते ज्योतीसारखे आहेत.

### भव्य कल्पना

विष्णु-सहस्रनामामध्यें भगवंताचीं सारीं नांवें एकत्र करून एक भव्य कल्पनासृष्टि उभी केली आहे. तो मोठा अद्‌भुत ग्रंथ आहे. त्यांत एके ठिकाणीं 'शब्दातिगः' 'शब्दसहः' अशा दोन विशेषणांनीं भगवंताचें वर्णन केलें आहे. "तो शब्दांच्या पलीकडे आहे, आणि शब्दांना सहन करणारा आहे." सूक्ष्म विचार करणारांचा हा अनुभव आहे कीं वाणींतून कोणत्या वेळीं काय प्रकट होईल तें सांगतां येत नाहीं. कधीं कधीं उलटें हि प्रकट होतें. सम्यक् वाणी प्रकट होणें कठिण असतें. म्हणून उत्तमांतल्या उत्तम साहित्यिकांची वाणी देखील भगवंतांनीं सहन करून घेतली.

### अंतःप्रेरणा

कालिदासानें अजविलापाचें जें वर्णन केलें आहे त्यानें हृदय भरून येतें. परंतु एखाद्या मातेचा मुलगा मरण पावतो तेव्हां ती आई इतका शोक करते कीं तें पाहून दुसऱ्याला हि रडूं येतें. कालिदासानें शब्दद्वारां शोक प्रकट केला इतकें च. त्या आईला लिहायला सांगितलें तरी तिच्या हातून लिहिलें जाणार नाहीं. ती कवि असेल आणि तिच्या हातांत लेखणी देऊन सांगितलें कीं, आपलें दुःख फुकट जाऊं न देतां त्यावर कांहीं लिही तरी त्यावेळीं ती लिहूं शकणार नाहीं. तिचा दुःखावेग कमी झाल्यावर कदाचित् ती लिहूं शकेल. लिहिल्यावाचून ज्यांना राहवत नाहीं ते च साहित्यिक.

### राम-नामाचा आनंद

'तुम्ही भूदानाचीं गीतें गा' अशी आज्ञा मी देऊं शकत नाहीं. तुम्हांला जें सुचेल तें च तुम्ही गाल. परंतु मी तुम्हांला एवढें मात्र सांगेन कीं, तुमच्यासमोर जें काय चाललें आहे तें

क्रांतीचें कार्य आहे. ही एक भगवंताची लीला आहे, असें च मला वाटतें. त्यांत जीं दृश्यें दिसतात त्यांतून मला स्फूर्ति मिळते. या विषयावर आजपर्यंत माझीं कित्येक व्याख्यानें झालीं आहेत. परंतु या विषयांतला माझा रस कमी होत नाहीं. रामनामांतली गोडी जशी कधीं कमी होत नाहीं तसा हा एक रमणीय आणि कमनीय विषय मला मिळाला आहे. ईश्वरानें मला जी वाक्शक्ति दिली आहे तिला इथें चांगली संधि मिळाली आहे. परमेश्वरानें हा धर्म एखाद्याच्या च चित्ताला दिला आहे असें नाहीं. जगामधें समानधर्मी हि असतात. तुमच्यामधून असे कोणी समानधर्मी असतील आणि त्यांना स्फूर्ति होत असेल तर त्यांनीं हा विषय घ्यावा.

**स्फूर्तीचा प्रश्न**

गांधीजींनीं रवीन्द्रबाबूंना विनंति केली होती कीं त्यांनीं जालियनवाला बागेच्या हत्याकांडावर कांहीं लिहावें. ते म्हणाले "मला अजून स्फूर्ति होत नाहीं" असें होऊं शकतें. उत्तमांतला उत्तम विषय असून हि एखाद्याच्या हृदयाला त्याचा स्पर्श होत नाहीं असें होऊं शकतें. म्हणून तुम्ही साहित्यिकांनीं भूदानावर लिहिणें तुमचा धर्म आहे असें मी म्हणणार नाहीं. सहज स्फूर्ति झाली तर हा एक लिहिण्यालायक विषय आहे एवढें च मी म्हणेन.

कांहीं लोक म्हणतात, "तुम्हांला खडकाळ माळरान च मिळत आहे" मी म्हणतों "भगवंतानें रुक्मिणीचा स्वीकार केला यांत विशेष नव्हतें. परंतु त्यानें कुब्जा दासीचा स्वीकार केला यांत त्याची विशेषता आहे." म्हणून मला जी माळरान जमीन मिळत आहे तिला मी सुपीक बनवीन. आश्रमांत शेतीचा प्रयोग करीत असतां मित्रांना मी म्हणे कीं, खराब जमीन घेऊन हि प्रयोग केला

पाहिजे. तर च देशाची सेवा होईल. भूदान-यज्ञांत लोक आपल्या हृदयाचे तुकडे कसे तोडून देत आहेत हें मी पाहत आहें. अनेकांनीं शबरीचीं बोरें अर्पण केलीं आहेत. हा सर्व विषय च मला स्फूर्ति-दायक आहे.

## समान धर्मियांना विनंति

तुमच्यांत जे कोणी समानधर्मी असतील त्यांना मी सांगेन कीं, तुम्ही या वस्तूचें निरीक्षण करा. ती शब्दांत आणण्याची प्रेरणा झाली तर तसा प्रयत्न करा. यांत कांहीं मलिनता दिसत असेल तर तिला निर्मळ करा. विरोधी कल्पना असतील तर त्या हि प्रकट करा. भट्टीमधें घातल्यावर च सोनें आपला गुण दाखवितें. म्हणून तुमच्या मनांत जें येईल तें प्रकट करा.

## माझ्याबरोबर फिरा

साहित्यिकांशीं बोलायला वेळ मिळाला कीं मला आनंद होतो. साहित्यिकांत जितकी विविधता दिसते तितकी इतरत्र दिसत नाहीं. सृष्टिमधें प्रत्येक प्राण्याचें स्वत:चें वैशिष्ट्य असतें. तसें साहित्यिकांची सृष्टि देखील विचित्र असते. आमच्या देवता हि अशा च विचित्र आहेत. एक तुळसी-दळानें प्रसन्न होते तर दुसरी बिल्व-पत्रानें. एक नंदीवर बसते, दुसरी मोरावर बसते तर गणपति उंदरावर बसतो. तुम्हां साहित्यिकांचा देव गणपति आहे म्हणून तुम्ही कोणत्या उंदरावर बसाल आणि तुमचें मन कोठें लागेल, हें सांगतां येणार नाहीं. संभव आहे, तुम्हांला नंदी,गरूड, मोर यांचें आकर्षण न वाटतां उंदराचें च वाटेल. परंतु माझी तुम्हांला प्रार्थना आहे कीं तुम्ही कांहीं दिवस माझ्याबरोबर फिरा, तुमच्या संगतीचा मला हि फार आनंद होईल.

पटना (बिहार)
२३-१०-५५

## : ४ :

# साहित्यिकांचा मौलिक गुण : खरेपणा

या आंदोलनामधें जी गुप्त स्फूर्ति आहे ती साहित्यिकांना सहज मिळाली आणि हृदयंगम झाली हें पाहून मला आनंद झाला. मैथिलीशरण यांच्या कवितांचा एक संग्रह सीयारामशरणजींनीं माझ्याकडे पाठविला आहे. त्यांत कांहीं भूदानावर कविता आहेत. तो संग्रह मला आवडला. साहित्यिकांना एकत्र बोलवून कांहीं सांगावें असें मीं मुद्दाम योजलें नव्हतें. जें पुण्यकार्य आपण करतों त्याचा सुगंध पसरतो च. आणि सुगंध पसरल्यावर भ्रमर आपोआप येतात. त्यांना बोलवावें लागत नाहीं. मी स्वत:ला साहित्यप्रेमी मानतों. जगांतलें बरेचसें साहित्य वाचण्याची संधि मला मिळाली आहे आणि पुष्कळशा साहित्याशीं माझा परिचय झाला आहे. मी साहित्यिक नसलों तरी साहित्याचें रसग्रहण करण्याची क्षमता परिस्थितीमुळें माझ्यांत निर्माण झाली आहे. तत्परिणामीं माझे स्वत:चे कांहीं विचार स्थिर झाले आहेत. म्हणून साहित्यिकांना पुन: पुन्हां बोलावून त्रास द्यावा असें मला वाटत नाहीं. त्यांची मला पर्वा वाटत नाहीं असें नाहीं. परंतु साहित्यिक सहज आकर्षिले जातात, ही च साहित्यिकांची विशेषता आहे. प्रयत्नपूर्वक त्यांना आकृष्ट करावें लागत नाहीं.

### साहित्यिक सत्यनिष्ठ असावा

साहित्यिकांमधें अनेक गुण असले तरी ज्या गुणाशिवाय त्यांना साहित्यिक च म्हणतां येणार नाहीं असा एक मूलभूत

गुण म्हणजे सत्यनिष्ठा होय. तो सज्जन असो कीं दुर्जन असो, परंतु खरा असावा. तो खरा सज्जन असला तर दुधांत साखर पडली. आणि दुर्जन असला तर आंतून बाहेरून खरा दुर्जन असावा म्हणजे जीवनाच्या शाळेंत त्याला शिक्षण मिळेल. जीवन एक अशी शाळा आहे कीं जिथें सरळ रस्त्यानें जा कीं कांटेरी रस्त्यानें जा, अनुभवजन्य ज्ञान प्राप्त होतें च. ही च या शाळेची खुबी. तसें सन्मार्गानें वागा कीं कुमार्गानें वागा जीवनांत साहित्याची निर्मिती होते च. जगांतलें श्रेष्ठ आणि सुंदर असें साहित्य एका वाटमाऱ्यानें लिहिलें आहे हें तुम्ही जाणतां च. त्याचें नांव वाल्मीकि. वाल्मीकि कविसम्राट आहे यांत शंका च नाहीं. परंतु तो एक महान् दुर्जन होता. मनुष्यहत्त्या करून जगत होता. परंतु त्याचें जीवन आंतून-बाहेरून सरळ आणि सत्यनिष्ठ होतें.

**राम नाम मनी दीप धरु जीह देहरी द्वार ।**
**तुलसी भीतर बाहर हूँ, ज्यों चाहसी उजियार ॥**

"आंत आणि बाहेर प्रकाश पाहिजे असेल तर जिभेच्या उंबरठ्यावर राम-नामाचा दिवा उभा करून दे." वाणी हें आंतर आणि बाह्य यांना जोडणारें साधन आहे. परंतु ज्यांचें आंत एक आणि बाहेर दुसरें असें असतें, त्यांची वाणी निस्तेज बनते. तिचा समाजावर प्रभाव पडत नाहीं.

**अनुभव आणि वाणी**

कालिदासानें 'विलाप' लिहिला आहे. जिचा पति किंवा मुलगा मरण पावला ती स्त्री विलाप करते. तिला कोणी शिकवावें लागत नाहीं. ती अनुभवाची गोष्ट असते. तेथें कृत्रिमता नसते. आईला मुलाच्या मरणाचा अनुभव येतो म्हणून ती शोक प्रकट

करते. असें कधीं ऐकलें नाहीं कीं अमुक एका आईला कॉलेजांत विलापाचें शिक्षण मिळालें नव्हतें म्हणून मुलगा मेला तरी तिनें विलाप केला नाहीं. ध्रुव बालकाची गोष्ट तुम्हां सर्वांना माहीत आहे. ध्रुव लहानसा बालक होता. तपस्या करायला जंगलांत गेला होता. त्याच्यासमोर साक्षात् परमेश्वर उभा राहिला. परमेश्वराला पाहून त्याच्या मुखांतून शब्द निघेना, त्याला काय बोलावें हें सुचेना. बोलून चालून बालक च तो ! असें म्हणतात कीं भगवंतानें आपल्या शंखाचा स्पर्श त्याच्या गालाला केला. आणि त्या स्पर्शा-बरोबर वाणी प्रकट झाली.

**'योऽन्तः प्रविष्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्'**

हा दिव्य श्लोक त्याच्या मुखांतून निघाला. ती दिव्य वाणी होती. त्याला जें दृष्य दिसलें त्याचा परिणाम झाला आणि त्या दृष्याच्या प्रभावानें ती वाणी त्याच्या मुखांतून निघाली. भगवंताला पाहून तो प्रसन्न झाला होता. अशा रीतीनें प्रत्यक्ष अनुभवांतून वाणी प्रकट होत असते. मुत्सद्दी लोकांचें मनांत एक, बाहेर एक असें असतें. ते जगाला भले फसवोत परंतु स्वतःला फसवूं शकत नाहींत. ते स्वतःचें मन उघडें करूं शकत नाहींत.

### परमेश्वरापुढें मन उघडें करा

आंत एक बाहेर एक असा भेद करणारा मनुष्य भाराभर पुस्तकें भले लिहो, परंतु काव्य लिहूं शकणार नाहीं. 'इंडियन पिनल कोड' लिहिणाऱ्या व्यक्तीला कधीं काव्य सुचेल काय ? ज्या ठिकाणीं अंतर्बाह्य एक च रस असतो त्या ठिकाणीं काव्याची गोडी प्रकट होते. तेथें पवित्र गंगा वहात असते. म्हणून मीं म्हटलें कीं, मनुष्य वाईट असला तरी खरा वाईट असावा. वाईट माणसें खरीखुरी वाईट नसतात ते पुष्कळसें ढोंग च करतात. गीतेनें

म्हटलें आहे, "**मध्ये तिष्ठन्ति राजसा:**" हा रजोगुण आहे. प्रयत्न-पूर्वक तो जागच्याजागीं च बसून राहतो. कारण त्याचें सर्व जीवन दंभानें भरलेलें असतें. पोशाख करतील तो नकली करतील. बोलतील ते वरवर बोलतील. स्वागतांत हि ढोंग च असतें. कित्येक ठिकाणीं मला मानपत्र दिलें जातें. तें मानपत्र आहे, कीं अपमानपत्र आहे हें कित्येक वेळां मला समजत नाहीं. कारण अंत:करणांतला भाव त्यांत नसतो. जाडजूड शब्द वापरून लिहितात.

एखादा खेडवळ माणूस येतो आणि म्हणतो "बाबाजी तुमच्या दर्शनानें मला फार आनंद झाला." किती बरं वाटतं तें ऐकून ! किती सरळ असतात ते लोक ! आणि हे लांबलचक मानपत्र देतात. संस्कृतांतले शब्द हुडकून हुडकून त्यांत भरतात. अलीकडे सर्वत्र असा दांभिकपणा दिसून येतो. कोणी आपल्याकडे बोलायला येतो आणि खूप बोलत राहतो. मनांतून आपण म्हणतों हा उठून जाईल तर बरं. पण जातांना जेव्हां तो म्हणतो "मीं तुमचा फार वेळ घेतला" तेव्हां आपण म्हणतों, "छे, छे, तसें कांहीं नाहीं." हा काय खरेपणा झाला ? म्हणायला असें पाहिजे कीं, "हो, तुम्ही माझा फार च वेळ घेतलांत, पुन्हां अशी चुक करूं नका.' प्रत्यक्ष वाईट वागण्यापेक्षां त्या वागण्यावर झांकण घालणें अधिक वाईट आहे. तुम्ही जर डॉक्टरापासून रोग लपवाल तर तो तुम्हांला काय मदत करील ? डॉक्टरजवळ मन उघडें केलें पाहिजे. त्या-प्रमाणें च ईश्वराजवळ हि अंत:करण खुलें केलें पाहिजे. सूरदासाचें वचन तुम्ही ऐकलें असेल.

**'मो सम कौन कुटिल खल कामी'**

हें काय त्यानें काव्य म्हणून लिहिलें ? त्यानें पाहिलें कीं, आपल्या मनांत पुष्कळ दुर्गुण भरले असून हि लोक आपल्याला

'साधु' 'साधु' म्हणतात, आणि जसजसे लोक साधु म्हणतात तसतसा आपल्या मनांत दंभ अधिक भरूं लागतो. म्हणून शेंवटीं त्यानें देवासमोर आपलें अंतःकरण मोकळें केलें. घराला आग लागल्यानंतर हि "काय गार आहे" असें म्हणत बसलां तर चालेल कां ? मनांमधें विकार आहे, पाप आहे, मलिनता आहे, तरी हि लोक मला 'चांगला' म्हणतात !! सर्व पाप, विकार, मलिनता एकदांची प्रकट होऊन जाईल तर माणूस खरा सज्जन तरी बनेल.

अति सज्जन आणि अति दुर्जन यांचें संमेलन होत असतें. कांहीं लोक आपल्या मनांतील भाव प्रकट करीत नाहींत. ही वाणीची चोरी च आहे. मनूनें म्हटलें आहे कीं 'वाणीची चोरी करणारे दुसऱ्या दहा चोऱ्या करणारांपेक्षां अधिक दोषी असतात.' सारे अर्थ वाणींतून निघतात. म्हणून ज्यानें वाणीची चोरी केली त्यानें जगांतल्या सर्व प्रकारच्या चोऱ्या केल्या असें होतें. परमेश्वरासमोर अंतःकरण मोकळें केलें पाहिजे. आणि परमेश्वर दुसरा कोण आहे ? ही सारी जनता च परमेश्वर आहे. तिच्यासमोर सर्व मोकळें करण्याची हिंमत पाहिजे. पाप-पुण्य जें काय असेल तें सर्व उघडें करून दाखविलें पाहिजे.

### हक्क कीं भिक्षा

जी गोष्ट मला पटली परंतु तुमच्या मनाला पटली नाहीं तिच्यावर मी आपणांकडून कविता लिहून घेऊं शकणार नाहीं. कवि दुसऱ्या कोणाच्या सांगण्यावरून कविता लिहित नसतो. तो स्वयंभू आणि स्वतंत्र असतो. महाभारतांतील त्या युद्धाची कथा तुम्ही जाणतां च. जमिनीचा प्रश्न होता. दोन्ही पक्षांकडून हक्क सांगण्यांत येत होते. शेंवटीं युद्धाची पाळी आली. तेव्हां धर्मराज म्हणाले, 'मला युद्ध नको आहे. आमचा हक्क आम्ही सोडायला

तयार आहोंत. आमची पहिली मागणी सबंध राज्य मिळावें ही होती. दुसरी मागणी अर्धे राज्य मिळावें ही होती. ती हि मी सोडून देतों. आतां माझी फक्त पांच गांवांची मागणी आहे.' श्रीकृष्ण विरोधी पक्षाकडे जाऊन त्यांना म्हणाले, 'तुमच्याजवळ पांच लाख गांवें आहेत. त्यांतलीं फक्त पांच गांवें पांडवांना द्या.' दुर्योधन म्हणाला 'पांच गांवें तर सोडा च परंतु सुईच्या टोंकावर मावेल इतकी जमीन देखील पांडवांचा हक्क म्हणून मी देणार नाहीं. हक्क न सांगतां भिक्षा मागणार असतील तर देईन.' यावरून युद्ध झालें.

**दरिद्रनारायणाचा प्रतिनिधि**

आज मी लोकांजवळ माझा म्हणजे च गरिबांचा हक्क मागतों आहे. जमीन सारी ईश्वराची आहे असें समजावतों. स्वत:ला मी दरिद्रनारायणाचा प्रतिनिधि समजतों. लोक मला जमीन देतात, चांगला भाव मनांत ठेवून देतात. परंतु एवढ्यानें मी तृप्त होत नाहीं. मी म्हणतों "चांगली जमीन द्या कीं पडीत जमीन द्या, परंतु मला सहावा हिस्सा द्या." गरिबांना मी म्हणतों, "तुम्हांला देतां येईल तितकी द्या." श्रीमंतांना सांगतों, "तुमच्या-जवळ थोडी ठेवून बाकी सगळी द्या." केवळ लाकडानें यज्ञ होत नाहीं. यज्ञाला तूप हि पाहिजे. चांगली जमीन हें तूप आहे आणि वाईट जमीन हीं लाकडें आहेत. मला दोन्ही पाहिजेत. मी ब्राह्मण आहें म्हणून मला भिक्षा मागायचा हक्क आहे. परंतु मी ब्राह्मण म्हणून मागायला आलों नसून दरिद्रनारायणाचा प्रतिनिधि म्हणून आलों आहें. आणि लोक मला जमीन देतात.

हें कलियुग आहे असें मानलें जातें. पण मला तर हें सत्य-युग दिसतें. याला कलियुग कां म्हणतात याचा विचार केला, तेव्हां

माझ्या लक्षांत आलें कीं, कलियुगांत देखील सत्ययुग असूं शकतें. कलियुग केवळ नाममात्र आहे. इतिहास वाचल्यानंतर मला कळून आलें कीं जीं चांगलीं युगें मानलीं गेलीं आहेत त्यांत हि वाईट लोक होऊन गेले. या कलियुगांत हि मोठमोठे सत्पुरुष होऊन गेले. म्हणून आतां सत्ययुग येत आहे असें म्हटलें पाहिजे. हें दर्शन तुम्हांला झालें तर तुम्हांला हि स्फूर्ति होईल.

**परमेश्वराचा साक्षात्कार**

या युगांत आंधळयांनीं हि दान दिलें आहे. तो आंधळा **रामचरण!** ज्या गांवीं मला फार थोडी जमीन मिळाली त्या गांवीं तो रात्रीं बैलगाडींतून आला आणि दान देऊन गेला. आमची मंडळी झोंपली होती. त्यांना उठवून त्यानें दान दिलें. दुसरे दिवशीं मंडळी मला सांगूं लागली कीं रात्रीं एक आंधळा आला आणि दान देऊन गेला. मीं म्हटलें, "तो आंधळा नसून प्रत्यक्ष परमेश्वर होता. त्याला आंधळा म्हणणारा खरोखर आंधळा आहे." अशा किती तरी घटना आहेत. मला हा भगवंताचा साक्षात्कार वाटतो. अशा घटनेंत काव्य च काव्य भरलेलें दिसतें. मला तर त्यानें सहज च स्फूर्ति मिळते.

जुनी गोष्ट आहे. एकदां रवींद्रनाथ ठाकुर गांधीजींच्या आश्रमांत आले होते. गांधीजी त्यांना म्हणाले, 'आपणांला स्फूर्ति होत असेल तर पंजाबमधल्या हत्याकांडावर एखादें काव्य लिहा.' रविबाबू म्हणाले, "मला स्फूर्ति होत नाहीं. कारण तेथें लोक शरण गेले. त्यांची मान वाकली होती." परंतु गांधीजींना त्या घटनेनें स्फूर्ति मिळाली. त्या ठिकाणीं गेलेल्या लोकांत एक दोन बाया हि होत्या. त्यांनीं आपल्या पतींच्या शवासाठीं मोठी बहादुरी दाखविली. गांधीजींना हें जें दर्शन झालें तें रविबाबूंना

होऊं शकलें नाहीं. त्यांना वाटलें यांत आपल्या लोकांची दुर्बलता च प्रकट झाली.

भूदानांत कांहीं लोक रद्दी जमीन हि देत आहेत. ज्यांना एवढें च दिसतें त्यांना काय काव्य सुचणार ? गंगेला पूर येतो तेव्हां घाण पाणी येतें तसें स्वच्छ निर्मळ पाणी हि येतें. त्याप्रमाणें च हें आहे. यांत स्वच्छ निर्मळ पाणी देखील येत आहे हें पाहून तुम्हांला स्फूर्ति झाली तर तुम्ही पुष्कळ काम करूं शकाल.

### अनुभूतीनें च काव्यस्फूर्ति

**'जें न देखे रवि तें देखे कवि.'** कवि क्रांतदर्शी असतो. म्हणजे पलीकडचें पाहणारा असतो. ग्रहण लागलें तेव्हां एकजण म्हणाला, "ग्रहण लागलें म्हणजे काय झालें ? सूर्य आणि पृथ्वी यांच्यामधें चंद्र आला ! यांत एवढी मोठी गोष्ट कोणती तें समजत नाहीं." मीं त्याला म्हटलें, "तूं या नदींत बुडून मेलास तरी काय बिघडलें ? तुझें नाक आणि आकाश यांच्यामधें पाणी आलें इतकें च. मग कां एवढा ओरडतोस ?" ग्रहणासारखी घटना जेव्हां घडते तेव्हां चिंतनाला संधि मिळते. सूर्याचा प्रकाश मंद होऊं लागतो; ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. खग्रास ग्रहण लागतें तेव्हां जगांतले शास्त्रज्ञ धावून जातात. त्यांना ती फार मोठी घटना वाटते. कारण ते ज्ञानी आहेत. जे ज्ञानी नाहींत त्यांना त्यांत कांहीं विशेष वाटत नाहीं. इकडे सूर्य अस्ताला चालला आहे आणि तिकडे आम्ही मौज मजा करतों, फूटबॉल खेळतों. वास्तविक ती ध्यान करण्याची वेळ असते.

मी जेलमधें अगदीं बादशहासारखा आनंदी होतों. एकदां जेलरनें विचारलें, "तुम्हांला येथें कांहीं दुःख होतांना दिसत नाहीं ?" मीं म्हटलें, "हा जेल मला नवीन नाहीं. हा च एक जेल आहे असें थोडें च आहे ? शरीर हा हि एक जेल आहे. त्यांत हि

आनंद आहे. पण या जेलमधें एक दुःख आहे." त्यानें विचारलें, 'कोणतें ?' मीं म्हटलें, "तें आतां च सांगत नाहीं. सात दिवसांची तुम्हांला मुदत देतों. तुम्ही विचार करून या." सात दिवसानंतर तो आला आणि म्हणूं लागला, "मला कांहीं सांगतां येत नाहीं." तेव्हां मी म्हणालों, "येथें चारी बाजूला भिंती उभ्या आहेत, त्यामुळें मला सूर्योदय आणि सूर्यास्त दिसूं शकत नाहीं एवढें च मला दुःख आहे."

सूर्योदय आणि सूर्यास्त यांचें किती रमणीय दृश्य असतें तें पाहण्यास मिळालें नाहीं तर एखादें रत्न हरविल्याचें दुःख होतें. जो अशीं दृश्यें पाहतो त्याला काव्यस्फूर्ति होते. इतरांना काव्य स्फुरत नाहीं.

शहरावर बॉंब पडला आणि सर्व शहर बेचिराख झालें. मिलिटरीचे लोक तिकडे धांवून गेले आणि म्हणूं लागले "फार नुकसान झालें नाहीं. फक्त दहा टक्के नुकसान झालें आहे." असें गणिताच्या भाषेंत जेथें बोललें जातें तेथें असें च व्हायचें. एखाद्या घरवाल्याला म्हणाल "दहांतला फक्त एक च मेला. नऊ तर जिवंत आहेत. मग १० टक्के हानीबद्दल एवढा शोक कसला ?" तर तो काय म्हणेल ? घडलेली घटना ज्याला सामान्य वाटते त्याला कोठून स्फूर्ति होणार ? चारी बाजूला करुणा आणि आनंद भरलेला असून हि त्या करुणेचें आणि आनंदाचें ज्याला भान नसतें त्याला काव्य कसें स्फुरणार ? दुःखाची आणि आनंदाची अनुभूति जेव्हां तुम्हांला होईल, तेव्हां तदनुकूल तुमचा सहयोग मिळेल. सत्यनिष्ठेनें ज्यानें वाणीचा उपयोग केला त्यानें लाखो एकरापेक्षां हि अधिक दान दिलें असें म्हटलें जाईल.

गया (बिहार)
३-८-१९५३

: ५ :

# साहित्यिक ईश्वराहून उंच

मी आज बंगालींतून बोलूं शकलों असतों तर फार आनंद झाला असता. मी बंगाली वाचूं शकतों, आणि साहित्यिक बंगालीमधें बोलले तर त्यांचें बोलणें समजूं हि शकतों. परंतु बोलूं शकत नाहीं. दोन चार महिने बंगालमधें राहण्याची संधि मिळाली तर मात्र बंगालीमधें व्याख्यानें देऊं शकेन.

हिंदुस्थानांतल्या सर्व भाषांशीं माझा प्रेम-परिचय व्हावा असा मीं प्रयत्न केला आहे. ज्ञान-परिचय व्हायला पुष्कळ वेळ पाहिजे. इतका वेळ माझ्यासारख्या व्यक्तीला कोठून मिळणार? परंतु मीं प्रेम-परिचय करून घेतला आहे. दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील जवळजवळ सर्व भाषा मला समजतात.

**परमेश्वराचें काम**

भूदान-यज्ञाच्या कामानिमित्त फिरतांना ठिकठिकाणीं साहित्यिकांना भेटण्याची सुसंधि मला लाभली आहे. सर्वांनीं भूदान-यज्ञाला आपली हार्दिक सहानुभूति दाखविली, आणि त्यांच्या मनांत उत्साह उत्पन्न झाला. मीं कांहीं विशेष केलें असें नाहीं. परंतु ईश्वर एखाद्या कामाला चालना देऊं इच्छितो तेव्हां सहस्र-मुखानें देतो. चहूंकडे तें काम पसरतें, आणि मग तें मानवी राहत नाहीं.

**कालिदासानंतर रवींद्रनाथ**

बंगाल साहित्यिकांचा देश मानला जातो. ही पूर्व दिशा आहे. सूर्योदय प्रथम पूर्वेला होतो. तसें पाहिलें तर आज पूर्व

कोणती आणि पश्चिम कोणती हें सांगणें कठिण आहे. हल्लीं सुदूर पूर्व (Far East) अशी भाषा बोलली जाते. पृथ्वी गोल असल्या-मुळें जी पूर्व असते ती पश्चिम असते आणि जी पश्चिम असते ती पूर्व हि असते. तथापि आधुनिक हिंदुस्थानच्या इतिहासांत अर्वाचीन भारतीय साहित्याचा उदय बंगालमधें च झाला. येथील साहित्यि-कांचीं अनेक नांवें तुम्ही घ्याल. तीं सगळीं हिंदुस्थानच्या परिचयाचीं नाहींत. परंतु बंकिमचंद्र, रवींद्रनाथ आणि शरश्चंद्र यांची ओळख नसलेले शिक्षित लोक हिंदुस्थानांत कुठें च नसतील. बंगालमधल्या इतर मोठ्या लोकांचीं नांवें हि हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहेत, परंतु त्यांचा उल्लेख मी येथें करीत नाहीं. कारण ते अन्य क्षेत्रांतले ज्ञानी होते. साहित्याच्या क्षेत्रांत हीं तीन नांवें साऱ्या हिंदुस्थानांत अजरामर झालीं आहेत. त्यांत हि कालिदासानंतर भारतीय संस्कृतीचें समग्र रूप पाहणारा आणि सम्यक् रूपांत तें व्यक्त करणारा रवींद्रनाथाहून श्रेष्ठ साहित्यिक क्वचित च झाला असेल. उत्तर प्रदेशचे महाकवि तुलसीदास, महाराष्ट्राचे ज्ञानदेव, दक्षिण भारताचे कंबन, इत्यादि दुसरे अनेक महाकवि होऊन गेले. परंतु त्यांची योग्यता वेगळ्या कोटीची होती. ते धर्मपुरुष होते. परंतु साहित्यिक या नात्यानें ज्यांनीं भारतीय संस्कृतीचें, केवळ धर्म दृष्ट्या च नव्हे तर समग्र जीवन-दृष्ट्या सर्व पैलूंचें दर्शन घेतलें असे एक रविबाबू च होते.

### अर्वाचीन साहित्यभूमि : बंगाल

जीवनाच्या अनेक पैलूंचें ज्यांना सम्यक् दर्शन झालें असें महापुरुष कालिदासानंतर रवींद्रनाथ च होऊन गेले. म्हणून अर्वा-चीन काळापुरतें बोलायचें तर असें म्हणतां येईल कीं येथें पूर्व-दिशेला प्रथम उदय झाला. प्राचीन काळची गोष्ट वेगळी होती.

त्या काळीं इतर ठिकाणीं हि प्रकाशाचा उदय झाला होता. भगवान बुद्धाच्या काळीं बिहार आघाडीवर होता. उपनिषदांच्या युगांत कदाचित् पंजाब आणि उत्तर प्रदेश आघाडीवर होते. परंतु कालिदासानंतर अलीकडील काळांत अर्वाचीन, भारतीय साहित्यामधें शंभर दोनशें वर्षांपासून बंगाल च आघाडीवर आहे. अशा ठिकाणच्या साहित्यिकांना भेटण्याची संधि मिळाली याबद्दल मला आनंद होत आहे.

**भूदान-यज्ञाची पूर्व पीठिका**

मीं मराठीमधें कांहीं लिखाण केलें आहे, तें लोकांना आवडलें आहे आणि तें घरोघर वाचलें हि जातें. परंतु शिकलेले लोक त्याकडे साहित्याच्या दृष्टीनें न पाहतां जीवन-विचाराच्या दृष्टीनें, धर्म-विचाराच्या दृष्टीनें पाहतात. म्हणून मी साहित्यिक आहें असा जसा माझा दावा नाहीं; तसा च तो माझ्याविषयीं दुसऱ्यांचा हि नाहीं. परंतु साहित्याचें मूल्य, त्याचें महत्त्व आणि त्याची शक्ति मी जाणतों. तसें च पाश्चात्य आणि पौर्वात्य देशांतील आठ दहा भाषांचें साहित्य चाळण्याची संधि मला मिळाली असल्यामुळें साहित्याशीं माझा परिचय आहे.

मी लहानपणीं कांहीं लेखन करीत असें, कविता हि करीत असें. परंतु लोक मला गणिती म्हणून च ओळखतात आणि ही गोष्ट खरी हि आहे. येथें आल्याबरोबर व्यासपीठावरील हे सारे दिवे किती आहेत तें मीं मोजून टाकले.

रामकृष्ण परमहंसांनीं एक दृष्टांत दिला आहे. एक गृहस्थ आले आणि आंब्याचें झाड पाहून त्याच्यावरचे आंबे मोजूं लागले. दुसरे गृहस्थ आले त्यांनीं झाडाला आंबे लागलेले पाहतां च दोन-

चार आणायला सांगितले आणि खाऊन टाकले. हे पहिले गृहस्थ आंबे मोजत च बसले.

लहानपणीं मी रामकृष्ण परमहंसाचें साहित्य पुष्कळ वाचत असें. इंग्रजी, मराठी आणि बंगाली तिन्ही भाषांतून त्यांचें साहित्य मीं वाचलें आहे. त्यांनीं दिलेलें तें आंब्याचें उदाहरण येथें लागू पडते. मीं दिवे पाहतां च मोजून टाकले. अकरा दिवे होते. मला स्मरण झालें कीं आमचीं इंद्रियें हि अकरा च आहेत आणि त्या एकादश इंद्रियांच्या ज्योतीनें सर्व विश्व प्रकाशित झालें आहे. त्या दीपकांकडे पाहतां पाहतां मी भावविभोर होऊन गेलों.

**काव्य-रचनेची हौस**

लहानपणीं मला कविता रचायची हौस होती. एकेक कविता करायला दोन दोन, तीन तीन दिवस लागत. कविता गुणगुणून पाहिल्यानंतर मला कळे कीं ती आतां सर्वांगसुंदर झाली. मी तेव्हां लहान च होतों. त्यामुळें मीं लिहिलेलें सर्व च मला सर्वांगसुंदर वाटे. लहानपणीं मी बरा च अशक्त होतों. थंडीच्या दिवसांत शेकायला चुलीपुढें बसलों म्हणजे मला कविता लिहिण्याची स्फूर्ति होई. कविता उत्तम झाली अशी माझी खात्री झाली कीं मी ती अग्निनारायणाला अर्पण करून देई. अशा रीतीनें त्या काळच्या सर्व कविता मीं अग्निनारायणाला अर्पण करून टाकल्या, माझ्या मित्रांनीं त्यांतल्या दोन चार कविता हिसकून घेतल्या तेवढया च आज शिल्लक आहेत.

कविता सर्वांगसुंदर झाल्याची खात्री पटल्यानंतर च ती मी अग्निनारायणाला अर्पण करीत असे. यांत यज्ञभावना होती. ती च भावना भूदान-यज्ञामधें हि आहे. यज्ञभावनेची माझ्या वृत्तींतील ही पूर्वपीठिका मीं सहज तुम्हांला सांगितली.

कदाचित् तुम्हां साहित्यिकांना वाटेल कीं अशा तऱ्हेनें कवितांची आहुति देणें योग्य नाहीं. येशू ख्रिस्तानें म्हटलें आहे ना ? दिवा लावाल तर काय भांड्याखालीं झांकून ठेवाल ? तो चांगला उंचावर ठेवला पाहिजे. तसें सर्वांगसुंदर साहित्य असेल तें जगापुढें प्रकट केलें पाहिजे, असें कांहीं लोकांना वाटतें. परंतु परमेश्वराची वस्तु परमेश्वराला च अर्पण करावी अशी माझी त्यांत दृष्टि होती. त्या आहुतीनें जगाचें कांहीं नुकसान झालें आहे असें मला वाटत नाहीं. उलट त्यामुळें माझ्या अंतःकरणांत एक-एक विचार स्थिर होत गेला.

**आत्मनिष्ठेची वृद्धि**

वाफेमध्यें शक्ति आहे हें पूर्वीं लोकांना माहीत नव्हतें. कारण वाफ उत्पन्न झाल्याबरोबर हवेमध्यें निघून जाई. म्हणून तिच्या शक्तीचें आकलन होत नसे. परंतु आतां एक युक्ति हातीं लागली आहे. वाफ कोंडून ठेवली म्हणजे तिची शक्ति प्रकट होते हें आपल्याला कळून आलें. तसें साहित्याची वाफ उत्पन्न करून ती अंतर्यामांत जिरवून टाकल्यानें कांहीं नुकसान होत नाहीं. उलट त्यामुळें आत्मनिष्ठा वाढते.

विचाराचें प्रकाशन वाणीनें होऊं शकतें परंतु जीवन, आचरण, ही वाणीहून हि खोल वस्तु आहे. तिच्यामुळें विचाराचें प्रकाशन अधिक चांगलें होतें.

मी ब्रह्मशोधनासाठीं घरांतून बाहेर पडलों तेव्हां काशीला आलों. तिथें गंगेच्या कांठावर बसून कविता लिहिण्याची हौस आणखी वाढली. तेथल्या शांत वातावरणांत ध्यान आणि चिंतन करून मी कविता रची. आणि उत्कृष्ट साधली कीं गंगार्पण करी. अशा रीतीनें अग्निनारायणानंतर गंगार्पण झालें.

**आईची प्रेरणा**

लहानपणची गोष्ट आहे. माझी आई गीतेवरील प्रवचनें ऐकायला जाई. ती म्हणे "गीता संस्कृतांत आहे, मला ती समजत नाहीं. म्हणून मला मराठी गीता आणून दे." तेव्हां मीं तिला गीतेचा एक गद्य अनुवाद आणून दिला. तिनें तो वाचला. आणि म्हणूं लागली "हें तर गद्य आहे. पद्य असतें तर बरें झालें असतें." त्यावेळीं जो पद्य अनुवाद उपलब्ध होता तो मीं तिला आणून दिला. मला तो तितकासा पसंत नव्हता, परंतु दुसरा पद्य अनुवाद मिळत नव्हता. म्हणून कठिण असला तरी तो च तिला द्यावा लागला. त्यावेळीं मी कॉलेजमधें शिकत होतों. आई मला म्हणाली, "हें पद्य तर संस्कृत इतकें च कठिण आहे." तेव्हां मीं म्हटलें, "याहून सोपें दुसरें भाषांतर च नाहीं." त्याबरोबर ती सहज बोलून गेली 'मग तूं स्वतः च कां अनुवाद करीत नाहींस ? हा मुलगा गीतेचा अनुवाद करूं शकेल इतका माझ्याबद्दल तिला विश्वास कशामुळें वाटला तें माहीत नाहीं. कदाचित् तिनें माझें कविता लिहिणें आणि अग्नीला अर्पण करणें पाहिलें असेल; त्यामुळें तिला विश्वास वाटला असावा. तें कसें हि असो परंतु मला जर कोणाकडून जास्तींत-जास्त बळ लाभलें असेल तर तें माझ्या आईकडून लाभलें आहे. [हें बोलतांना विनोबांचा कंठ दाटून अश्रुधारा वाहूं लागल्या.] तिनें मला कधीं शिकविलें नाहीं. तिला तें शक्य हि नव्हतें. ती विद्वान नव्हती कीं शिकली सवरलेली नव्हती. तिला वाचायला मीं च शिकविलें होतें. परंतु तिनें माझ्यावर जो अत्यधिक विश्वास टाकला होता त्यानें च मला बळ लाभलें. ती एक जादू च आहे. ही च जादू वेद आणि उपनिषदें यांत हि मला आढळली.

अनुक्रम वि. क्रमांक नों: दि: ......१९


श्रुतीला माता म्हणतात '**मातृ-पितृ-सहस्राणाम्**' असें शंकराचार्यांनीं श्रुतीचें––वेदांचें––वर्णन केलें आहे. श्रुति किंवा वेद हे सहस्र मातापित्याहून हि अधिक करुणामय आहेत. श्रुति आमच्यावर विश्वास ठेवते आणि त्या विश्वासानें च आपल्याला बलवान् करते. आपण वेदापुढें जाऊन म्हणतों 'आम्ही दीन आहों, पापी आहों, वासनेनें भरलेले आहों.' श्रुति आमचें हें भाषण ऐकून तर घेते परंतु म्हणते 'तूं ब्रह्म आहेस' मानवतेवर केवढा हा विश्वास ! आम्ही स्वतः तिच्याजवळ जाऊन म्हणतों 'आम्ही नादान आहों, पापी आहों तूं आमचें संरक्षण कर' तर ती सुरवातीला च सांगते, कीं 'तूं पापी नसून ब्रह्म आहेस.'

इतर अनेक धर्मग्रंथ आहेत, ते म्हणतात 'तूं पापी आहेस, आतां पुण्यवान हो.' परंतु श्रुति असें म्हणत नाहीं. ती विश्वास-पूर्वक म्हणते––'तूं ब्रह्म आहेस.' माझ्या आईनें माझ्यावर असा च विश्वास टाकला. त्यावेळीं मीं तिचें म्हणणें ऐकून घेतलें. परंतु माझ्या मनांत तें राहून गेलें होतें. माझी आई मरून गेल्यानंतर कित्येक वर्षांनीं मला मराठींत गीतेचा पद्यानुवाद करण्याची प्रेरणा झाली. त्या अनुवादाला मीं 'गीताई' गीता माऊली, म्हणजे गीता-माता असें नांव दिलें. गीताई महाराष्ट्रांत घरोघर पोंचली असून तिच्या तीन लाखांवर प्रति खपल्या आहेत. या पुस्तकाबद्दल लोकांत इतका आदर कां आहे, याचा जेव्हां मी विचार करूं लागतों तेव्हां उत्तर हें च मिळतें कीं, पूर्वीं मीं जें कांहीं चिंतन, मनन केलें आणि लिहिलेलें अग्निनारायणाला आणि गंगेला समर्पण केलें त्याचा च हा प्रसाद आहे. गीताई मीं लिहिली असें मला वाटत नाहीं. ती साहित्यिक कृति नसून तें धर्मचिंतन आहे असें मी समजतों. तें मातेच्या प्रेरणेनें च लिहिलें गेलें.

## साहित्यिक ईश्वराहून हि मोठा

साहित्यिकांचा आशीर्वाद मी इच्छितों. कारण साहित्याच्या शक्तीवर माझा फार विश्वास आहे. साहित्याची शक्ति परमेश्वराच्या शक्तीबरोबरची आहे असें मी मानतों. हें माझें म्हणणें धाष्टर्याचें वाटेल. परंतु ब्रह्मांडांत जें कांहीं आहे ती ईश्वराची शक्ति मानली जाते आणि तें सर्व साहित्यिकांच्या वाणींत येतें. परंतु जें ब्रह्मांडांत नाहीं तें हि साहित्यिकांच्या वाणींत येतें. शशश्रृंग ईश्वराच्या सृष्टींत नाहीं पण साहित्यिकांच्या सृष्टींत आहे. आकाश-पुष्प कोणीं पाहिलें ? परंतु साहित्यिकांच्या सृष्टींत तें आहे. आकाश-गंगा देखील आकाशांत नाहीं.परंतु साहित्यिकांच्या सृष्टीमध्यें आहे. साहित्यिकांना आकाशांत, पाताळांत आणि पृथ्वीवर गंगेच्या धारा दिसतात. अशा रीतीनें गंगेच्या तीन-तीन धारा त्यांना दिसतात. परंतु ईश्वराच्या सृष्टींत हिमालयांतून निघालेली आणि गंगासागरांत मिळालेली एक च गंगा आहे. म्हणून मी म्हणतों कीं साहित्यिकांची शक्ति फार मोठी आहे.

## साहित्य काय आहे ?

भूदानयज्ञावर तुम्ही लिहावें असें मी तुम्हांला सांगणार नाहीं, कारण तसें सांगण्यांत धृष्टता आणि मूर्खता आहे. धृष्टता या अर्थानें कीं साहित्यिक आपला धंदा चांगला जाणतात. उचित काय आणि अनुचित काय हें त्यांना सहज च समजत असतें. त्यांना तें सांगावें लागत नाहीं. म्हणुन त्यांना सांगूं पाहणें ही धृष्टता आहे. आणि मूर्खपणा अशा अर्थानें कीं कोणता हि साहित्यिक दुसऱ्याच्या सांगण्यावरून लिहीत नसतो. त्याला बाहेरचें एखादें निमित्त मिळालें कीं अंत:प्रेरणेनें च तो लिहीत असतो. साहित्यिक लिहायला बसतो तेव्हां आपण जें लिहिलें त्यानें जगावर उपकार

झाला आहे याचें त्याला भान असत नाहीं. तसें भान झालें तर तें साहित्य ठरणार नाहीं. साहित्य तें च जें आत्म्यासह चालतें. सहित म्हणजे बरोबर चालणारा सोबती. म्हणून जेव्हां साहित्य अंतःकरणाच्या खोलींतून बाहेर येतें तेव्हां साऱ्या जगाला पावन करतें. तें कोणत्या गुहेंतून निघतें हें कोणी सांगूं शकत नाहीं. त्या गुहेंत दुनियेची पोंच नसते. गंगा बाहेर आली म्हणजे लोक तिला ओळखतात आणि तिच्यांत अवगाहन करतात; परंतु ती कोणत्या गुहेंतून निघते हें कोणाला समजत नाहीं.

## साहित्यिक आणि राज्याश्रय

नुकती च दिल्लीला 'साहित्य अकादमी' स्थापन झाली. सबंध भारतीय साहित्यांत 'अकादमी' साठीं कांहीं शब्द च मिळाला नाहीं का ? हिंदुस्थानांत १० हजार वर्षांपासून विकसित झालेल्या १०-१२ तरी भाषा आहेत. त्या भाषांमध्यें या विषयासाठीं शब्द च मिळाला नाहीं तर तें काम तरी कसें व्हायचें ? विज्ञानाची गोष्ट वेगळी आहे. विज्ञान-विषयक शब्द आमच्या भाषांत कदाचित् सांपडणार नाहींत. परंतु साहित्याच्या क्षेत्रांत समर्पक शब्द मिळूं नये ही गोष्ट मला खटकते. मीं विचार केला कीं नांव कांहीं कां असेना, काम तर होईल ! पण काम काय होतें आहे ? साहित्यिकांना बक्षिसें दिलीं जातात. आतां विचार करा, जगांत कधीं बक्षिसें देऊन काम होतें का ? तुलसीदास आणि कबीर यांना कोणतें इनाम मिळालें होतें ? हां, आमच्या रवींद्रनाथांना बक्षिस मिळालें होतें खरें. त्याला 'नोबेल प्राईज' म्हणतात. हल्लीं प्रत्येक गोष्टीची किंमत पैशामध्यें केली जाते. एखाद्यानें उत्तम साहित्य लिहिलें तर त्याला चांगलें खाऊं, पिऊं घातलें पाहिजे असें म्हटलें जातें. पण खाण्यापिण्याचा साहित्याशीं काय संबंध ? साहित्यिकांच्या उपजीविकेसाठीं कांहीं

पाहिजे हें मी कबूल करतों. परंतु इनाम देण्यानें साहित्यिकांना काय मदत होते ? कारण त्यांच्या जीवनाचा मूळ स्रोत वेगळा च असतो.

**भगवदर्पण**

आंध्रमधें पोतना नांवाचे एक भक्त कवि होऊन गेले. त्यांनीं भागवताचा तेलगूमधें अनुवाद केला. ते शेतकरी होते; त्यांना संस्कृत फारसें येत नसलें तरी थोडें येत होतें म्हणून त्यांना अनुवाद करतां आला. त्यांनीं ग्रंथ लिहिल्यावर मित्रांनीं सल्ला दिला कीं, हा ग्रंथ राजाला अर्पण करा म्हणजे ह्याचा खूप प्रचार होईल. त्या काळीं साहित्याचा आदर करणारे राजे असत.पोतनानें 'विचार करीन' एवढें च सांगितलें. परंतु अर्पण-पत्रिकेंत त्यानें लिहिलें, "ही भगवंताची कृति भगवंताला च अर्पण करीत आहें."

पोतना शेती करून, मातींत आपला घाम गाळून निर्वाह चालवी. उरलेल्या वेळांत त्यांनीं भागवत लिहिलें. तें काय राजाला अर्पण करण्यासाठीं ? ज्यांनीं लक्ष्मीला दासी नव्हे पण माता मानलें अशा च लोकांकडून हिंदुस्थानांत साहित्याची वृद्धि झाली आहे. जें निरंतर साहित्य निर्माण करीत होते ते जन-समाजांत मिसळून काम करीत आणि देहधारणेपुरतें जें काय मिळेल त्यावर संतुष्ट राहत. त्यांनीं राजांची पर्वा केली नाहीं. पैशानें ते खरीदले जाणारे नव्हते. अशा लोकांमुळें च हिंदुस्थानचें साहित्य वाढलें आहे. तुलसीदास, कबीर, पोतना, तुकाराम इत्यादि सर्वोत्तम साहित्यिकांकडे पहा. ते राज्याश्रित नव्हते तर भगवंताश्रित होते. तुम्ही त्यांचे च वारस आहांत.

**अंत:प्रेरणेनें लिहा**

जनतेमधें विचाराचा कोणता प्रवाह चालावा हें तुम्हां साहित्यिकांना कळतें. त्यांतून च तुम्हांला सहज प्रेरणा मिळेल. तुम्ही अंत:प्रेरणेनें लिहा. त्यांत च तुमचें, माझें आणि हिंदुस्थानचें कल्याण आहे. मी एक च गोष्ट सांगूं इच्छितों. जीवनशुद्धीचें कार्य आपण सतत करीत राहिलें पाहिजे.

आणखी एक गोष्ट. साहित्यिकांजवळ हि कांहीं संपत्ति असते. आतां हा सार्वजनिक यज्ञ सुरू झाला आहे तेव्हां त्यांत तुम्ही हि आपला भाग अर्पण केला पाहिजे. त्यानें इतर लोकांना प्रेरणा मिळेल. जनतेची जी मागणी आहे तींत आपण भाग घेतला याबद्दल तुमच्या चित्ताला हि समाधान वाटेल. म्हणून तुम्ही कांहीं ना कांहीं द्यावें अशी माझी इच्छा आहे. आणि साहित्याची आपणांला प्रेरणा होऊन आपणांला प्रसादरूप जें द्यायचें असेल तें द्या. तुम्हां सर्वांना भक्तिपूर्वक प्रणाम.

बलरामपूर (मेदिनीपूर)
१९-१-५५

---

: ६ :

# साहित्यिकाला एक ठिणगी च पुरे

तुम्हां लोकांना भेटण्याची मला आज संधि मिळाली याबद्दल मला फार आनंद वाटत आहे. उत्तरप्रदेश, बिहार आणि बंगाल या तीन मोठ्या प्रांतांतून माझी यात्रा झाली आणि तिन्ही ठिकाणच्या

साहित्यिकांचा आशीर्वाद, सहानुभूति आणि सहकार्य मला मिळालें. उत्तर प्रदेशांत राष्ट्रकवि मैथिलीशरणजी गुप्त आणि सियाराम-शरणजी गुप्त यांच्या प्रयत्नानें कांहीं साहित्यिकांना भेटण्याची संधि मला मिळाली होती. बिहारमधें हि साहित्यिकांनीं चांगलें सहकार्य केलें. बेनीपुरीजी आणि दिनकरजी या दोघांनीं भूदानावर कांहीं लिहिलें आणि बरी च सहानुभूति दाखविली. बंगालमधें तर मला अपेक्षेपेक्षां जास्त यश मिळालें. तेथील प्रतिष्ठित साहित्यिक मला भेटायला आले होते. अत्यंत प्रेमानें त्यांनीं माझें म्हणणें ऐकून घेतलें. ताराशंकरजी वंद्योपाध्याय यांनीं 'आनंद बाजार पत्रिके' मधें भूदानावर एक लेख हि लिहिला. त्यांत त्यांनीं म्हटलें आहे कीं सुरवातीपासून च माझा हार्दिक पाठिंबा या चळवळीला आहे.

**साहित्यिक संप्रदायातीत असतात**

तेलंगणामधें या कामाची सुरवात होऊन आतां चार वर्षें झालीं. या आंदोलनानें सर्वांचें लक्ष खेंचून घेतलें. प्रथम विधायक किंवा रचनात्मक कार्य करणारांचा उत्साह या कामानें वाढला. तें स्वाभाविक हि होतें. जे लोक अनेक वर्षें गांधीजींच्या बरोबर राहून, खादी, ग्रामोद्योग, नई तालीम, ग्रामसफाई इत्यादि कामें करीत होते ते अलीकडे कांहींसे निराश झाल्यासारखे झाले होते. भूदानानें त्यांना चांगली च प्रेरणा मिळाली. भूदान-यज्ञानें त्यांच्यांत जणूं नवचैतन्य च आलें. असा अनुभव या प्रदेशांत हि आला. आपण पाहतां च कीं, या ठिकाणीं गोपबाबू वगैरेंनीं या कामांत उडी घेतली. आणि ते सतत पदयात्रा करीत आहेत. या विधायक कार्यकर्त्यांनंतर ज्यांचें लक्ष या चळवळीकडे गेले, त्यांत हिंदुस्था-नांतील साहित्यिकांचा उल्लेख केला पाहिजे. हें हि स्वाभाविक च

होतें. साहित्यिक कोणत्या हि संप्रदायाचे नसतात. संप्रदायातीत हें च साहित्यिकांचें लक्षण. जे संप्रदायांत बद्ध होतात ते चिरंतन साहित्यिक नसून तात्कालिक असतात. चिरंतन साहित्यिक सर्व पंथांहून आणि संप्रदायाहून अलिप्त असतात. जीवनांत एखादी क्रांतिकारी किंवा मूलगामी घटना घडली तर सहज च त्यांना ती आकर्षून घेते. मग ती घटना कोणत्या हि संप्रदायाची अगर पंथाची असो.

### भूदानानें गरिबांना आशा

साहित्यिकानंतर राजकीय पक्षांचें लक्ष या कामाकडे गेलें. काँग्रेस, प्रजासमाजवादी वगैरे सर्व पक्षांना वाटलें कीं या कामाचा राजकारणावर प्रभाव पडूं शकतो म्हणून त्यांचें हि लक्ष याकडे वेधलें. गरिबांचें लक्ष तर प्रथमपासून च होतें. त्यांना वाटलें कीं, हें कार्य साक्षात् दरिद्रनारायणाकरितां च होत आहे. स्वराज्यानंतर दरिद्रनारायणाच्या सेवेचें अशासारखें एखादें आंदोलन व्हावें असें त्यांना वाटत होतें. स्वराज्य मिळाल्यानंतर तसें कांहीं घडलें नाहीं, हें आपण पाहिलें. ज्यांच्या हातीं सत्ता आली त्यांच्यापुढें अनेक अडचणी उभ्या राहिल्यामुळें तसें होऊं शकलें नाहीं. परंतु त्या गरिबांना भूदान-यज्ञ हें अमृत-सिंचनासारखें च झालें. तसें पाहिलें तर त्यांना भूदानानें फार मोठी मदत मिळाली असें नाहीं. आतांपर्यंत फक्त ३६ लाख एकर जमीन मिळाली आहे. ही जमीन वाटली जाईल तेव्हां कुठें ती त्यांच्या हातीं येईल. त्यांना अजून कांहीं मिळालें नसलें तरी हि हिंदुस्थानमधें ‘दरिद्रनारायणाची सेवा’ या शब्दाचा प्रचार होऊं लागला आहे. ‘दरिद्रनारायण’ हा शब्द तसा नवीन नाहीं. हा स्वामी विवेकानंदांचा शब्द आहे. त्यांची प्रतिभा केवढी महान ! त्यांना हा शब्द सहज च सुचला. नंतर देशबंधु दास

यांनीं तो प्रचारांत आणला, आणि गांधीजींनीं त्याला व्यापक स्वरूप दिलें. त्यांनीं खादीच्या चळवळींत देशभर दरिद्रनारायणा-करितां पैसा मागितला; तो त्यांना मिळाला आणि त्यांतून चरखा-संघ स्थापन झाला. त्यावेळीं आमचें राज्य नव्हतें. इंग्रजांचें होतें. खेडयांतल्या गरिबांना कोणी पुसत नव्हते. अशा वेळीं गांधीजींनीं सर्वांचें लक्ष त्यांच्याकडे खेंचलें. स्वराज्यानंतर आतां आपलें च राज्य होईल अशी आशा गरिबांना वाटत आहे. गरिबांच्या उत्थानाचें च कार्य प्रथम होईल अशी त्यांना उमेद आहे. लोकांची तर येथ-पर्यंत अपेक्षा होती कीं, ‘व्हाइसरीगल लॉज’ चें रूपांतर दवाखान्यांत होईल. गांधीजींनीं असें च म्हटलें होतें. पण तें घडलें नाहीं. त्या-वेळीं मी दिल्लीला निर्वासितांमधें काम करीत होतों. ते लोक म्हणत, गांधीजींनीं व्हाइसरीगल लॉजचा दवाखाना बनवावा असें म्हटलें होतें. पण तसें तर कांहीं होत नाहीं. त्यावेळीं त्यांना रहायला घरें हि नव्हतीं, त्यामुळें साहजीक च त्यांची नजर त्या मोठ्या इमारतीं-कडे जाई. ते म्हणत येवढ्या मोठया इमारतींत किती थोडे लोक राहतात !

### गांधीजींची असामान्य प्रतिभा

गांधीजींची प्रज्ञा असामान्य होती. त्यामुळें सामान्य जनतेशीं ते ताबडतोब एकरूप होत. मूठभर मीठ ती काय चीज ? तिच्याकडे कोणाचें लक्ष जाणार होतें ? हां ! गोखल्यांनीं असेंब्लीमधें एकदां म्हटलें होतें कीं मिठावर कर असूं नये. त्याचा आधार घेऊन गांधीजी म्हणाले लोकांना मीठ फुकट च मिळालें पाहिजे. इंग्रजी-मधें ‘ब्रेड अॅन्ड बटर’ म्हणतात. आपल्याकडे ‘नमक रोटी’ मीठ भाकरी म्हणतात. गांधीजी म्हणाले आम्ही मीठ बनवून इंग्रजांचा कायदा तोडूं. लोकांना वाटलें यांत काय कायदेभंग होणार ? पण

तसें झालें. कारण ती वस्तु च मौलिक होती. त्याप्रमाणें च दारूच्या दुकानावर पिकेटिंग (निरोधन) करण्याची गोष्ट घ्या. त्यांनीं स्त्रियांमार्फत निरोधन करविलें. दारूच्या दुकानावर निरोधन करण्याला कोणाला पाठवावें अशी त्यावेळीं चर्चा सुरू झाली. कारण तीं दुकानें म्हणजे गुंडांचे अड्डे. सगळयांत खालच्या थरांतील लोक तेथें जातात. तेव्हां गांधीजी म्हणाले, त्या ठिकाणीं स्त्रियांना पाठविलें पाहिजे. त्यावेळीं स्त्रियांची स्थिति काय होती ? त्या कधीं घराबाहेर पडलेल्या नव्हत्या. पडद्यांत असायच्या. त्यांच्या हातांत दागिने असत. शृंखला च त्या. सोन्याच्या असल्या तरी शृंखला च. त्यांना भीरु म्हटलें जाई. अशा भगिनींनीं गुंडांशीं सामना करण्याची ही सूचना लोकांना मोठी विचित्र वाटली. लोक म्हणत ‘तेथलें वातावरण घाणेरडें असतें, तेथें शिवीगाळ चालते, तिथें स्त्रिया कशा जातील ?’ गांधीजी म्हणाले स्त्री ही सभ्यतेची आणि संस्कृतीची मूर्ति आहे ना ? मग जिथें असंस्कृति असेल तिथें संस्कृतीनें गेलें पाहिजे. सद्भावनावान् व्यक्तीचें च तेथें काम आहे. अंधकाराशीं सामना प्रकाशानें च होतो. शेंवटीं स्त्रिया त्या ठिकाणीं गेल्या आणि त्यांना पाहून गुत्त्यावरील लोक शरमिंदे झाले. ही सर्व गांधीजींची कल्पकता होती. ज्यांना जगांत किंमत नाहीं अशा लोकांशीं एकरूप होण्याची अद्भुत कल्पना त्यांना सुचे आणि ती अगदीं सहजतेनें सुचे.

## साहित्यिक ठिगणी ओळखतात

या गोष्टींमुळें स्वातंत्र्याच्या लढाईला जोर मिळाला. कांहीं लोकांना उलटें च वाटे. ते म्हणत, दारूबंदी, खादी वगैरे गोष्टी स्वातंत्र्य-संग्रामाशीं जोडून दिल्यामुळें त्यांच्यांत प्राण आला परंतु खादी इत्यादि गोष्टी जीवनदायी असल्यामुळें त्यांच्यामुळें च

स्वराज्याच्या चळवळीमधें नैतिकता आली. आणि म्हणून स्वराज्य मिळालें. आतां स्वराज्यानंतर जें काय करायचें आहे तें गरिबांसाठीं च करायचें. कांहीं दिवसांनीं भूदान-यज्ञ सुरू झाला. ३६ लाख एकर जमीन आम्हांला मिळाली. ही गोष्ट मोठी नसली तरी अत्यंत महत्त्वाची आहे. फक्त जमीन च मोजली तर ती कितीशी मिळाली ? हिंदुस्थानांत ३०–४० कोट एकर जमीन आहे. त्यांत ३६ लाख एकर म्हणजे फक्त एक टका जमीन झाली. परंतु साहित्यिकांना ती विशेष गोष्ट वाटली. कारण त्यांना ठिणगीची ओळख पटते. इतरांना मोठ-मोठे पेट्रोमॅक्स (गॅसबत्त्या) लागतात. परंतु साहित्यिकांना एक ठिणगी च पुरी होते. प्रकाशाचा अंकुर पाहतां च त्यांना ओळख पटते. इतरांना प्रत्यक्ष बीं पाहून हि परीक्षा होत नाहीं. ते जेव्हां फळ चाखून पाहतात तेव्हां त्यांना आंबट कीं गोड तें समजतें. परंतु साहित्यिकांची चव स्वच्छ, निर्मळ असते, बिघडलेली नसते.

साहित्यिकांना आमच्या भाषेंत 'कवि' शब्दानें संबोधलें जातें. '**कविः क्रांतदर्शी**'. 'ट' ला 'ट' 'प' ला 'प' जोडून कांहीं ओळी लिहिल्या म्हणजे कवि होत नसतो. जो क्रांतदर्शी आहे, ज्याला पलीकडचें दर्शन होतें, तो कवि. डोळ्यावर पडदा आल्यामुळें जगाला हि जें दर्शन होत नाहीं तें कवीला होतें. कवीचें दर्शन साध्या डोळ्यांचें नसतें, त्याचें प्रातिभदर्शन असतें. किंचित् इषारा किंवा खूण मिळतां च तो समजून जातो. आतां आम्हांला इतकी तरी जमीन मिळाली आहे. परंतु आम्ही उत्तर-प्रदेशांत होतों तेव्हां किती जमीन मिळालेली होती ? तरी हि मैथिलीशरणजी आणि सियारामशरणजी यांना भूदान-यज्ञाचें आकर्षण वाटलें. ते म्हणाले 'अरे ! हें तर भारताचें हृदय आहे' हृदय आंगठ्याएवढें लहान

असतें. परंतु त्यांत जी ज्योति असते तें च आत्मतत्त्व. ते अत्यंत छोटें, अणुमात्र असतें. '**अणोरणीयान् महतो महीयान्**' परंतु त्याची प्रभा व्यापक असल्यामुळें ती अत्यंत महान् वस्तु ठरते. लहानशा वस्तूंत हि चेतना प्रकट झाली कीं ती वेगळी उठून दिसते.

विवेकानंद एकदां म्हणाले होते, 'धावत्या गाडींत इतकी शक्ति असते, परंतु रुळावरची मुंगी हि ती राक्षसीण धावत आलेली पाहूत रुळावरून बाजूला होते आणि सुरक्षित राहते. गाडी किती हि मोठी असली तरी ती मूढ, अचेतन, आहे. मुंगी लहान असली तरी तिच्यांत चैतन्य आहे म्हणून ती सुरक्षित राहते. तिला मारण्याची शक्ति गाडीमधें असत नाहीं.

चैतन्याचा अंश असलेली वस्तु साहित्यिकांना आकर्षित करते. म्हणून माझें म्हणणें आहे कीं, तुम्ही तटस्थ बुद्धीनें, या कामाकडे पहा. त्याचे भाट बनूं नका. उदासीन होऊन त्याकडे पहा. मी 'उदासीन' शब्द त्याच्या संस्कृत अर्थानें वापरला आहे. '**उत् आसीनः**'—उंचावर बसलेला. भूदान हा अहिंसेचा विचार आहे, सर्वोदयाचा किंवा एखाद्या संप्रदायाचा तो आहे असें समजून विचार करूं नका. स्वतंत्र बुद्धीनें विचार करा. यांत कोणतें क्रांतदर्शन होऊं शकतें तें पहा.

### भारताचा गौरव–ब्रह्मविद्या

हिंदुस्थानच्या भव्यतेचें वर्णन अनेक लोक अनेक प्रकारें करतात. कोणी म्हणतात, हिमालयासारखा पर्वत नाहीं, गंगेसारखी अद्भुत नदी नाहीं, आणखी हि कित्येक गोष्टी बोलल्या जातात. परंतु त्यामागें ममत्व असल्यामुळें त्यांची आपल्याला महत्ता वाटते. प्रत्येक माणसाला आपल्या देशाबद्दल ममत्व वाटत असतें, म्हणून त्याला आपल्या देशाचें महत्त्व वाटतें. आम्ही देखील

म्हणतों '**सारे जहाँसे अच्छा**'. 'काय चांगलें' असें विचारलें तर, म्हणतात 'हमारा'—'आमचा'. तो 'आमचा' शब्द सोडून दिला आणि इतर देशांशीं तुलना केली तर त्या गोष्टी तितक्या महत्त्वाच्या वाटणार नाहींत.

हिंदुस्थानांतली माती अमेरिकेंतल्या मातीपेक्षां चांगली आहे असें नाहीं. तसें पाहिलें तर अमेरिकेची माती ताजी आहे. तिच्यांत अधिक उत्पन्न निघूं शकतें. तेथें किती तरी मोठमोठ्या नद्या आहेत. त्यांच्यापुढें आमच्या गंगा नदीचा काय पाड? हिमालय पर्वत जगांत सर्वांत उंच आहे खरा. परंतु तो सोडल्यास आमचा हिंदुस्थान श्रेष्ठ आहे असें म्हणण्यासारखी दुसरी कोणती हि वस्तु आमच्या-जवळ नाहीं.

हिंदुस्थानची निसर्ग-रचना इतर देशांतल्या निसर्ग-रचनेपेक्षां श्रेष्ठ आहे असें नसलें तरी हिंदुस्थानांत च ब्रह्मविद्या निघाली असा मात्र माझा दावा आहे. तिच्या च जोरावर भूदान-यज्ञ चालला आहे. तिच्या तोडीची वस्तु जगामध्यें दुसरी नाहीं ही गोष्ट मी अगदीं स्वतंत्रपणें तटस्थ होऊन सांगत आहे. जगांतल्या पुष्कळशा भाषांचें आणि साहित्याचें अध्ययन मीं केलें आहे. परंतु '**तत् त्वम् असि**'—'तूं ब्रह्म आहेस' असें निष्ठापूर्वक सांगणारें साहित्य जगांतल्या इतर कोणत्या हि भाषेंत नाहीं. ही ब्रह्मविद्या हें च आमचें बळ. यांत च भारताचा गौरव आहे. '**भारत सारे जहांसे अच्छा**' आहे, कारण येथें ब्रह्मविद्या आहे.

### मांसाहार निवृत्ति

ही ब्रह्मविद्या अशी मात्र नाहीं कीं हिच्याबरोबर भ्रम किंवा अंधःकार राहील. ही इतकी बलशाली आहे कीं, हिच्या-

पुढें अंधकार टिकूं च शकत नाहीं. हिच्या बळावर च येथें कोटयवधि लोकांनीं मांसाहार सोडला. जगांतल्या दुसऱ्या देशांत आज जे प्रयोग होत आहेत ते पोरांच्या खेळासारखे आहेत. तिकडे 'व्हिजिटेरियन रेस्टॉरंट' (निरामिष खाणावळी) उघडतात. मांसाशन-त्यागाच्या चळवळीचा तिथें आतां कुठें आरंभ झाला आहे. हिंदुस्थानांत दहा हजार वर्षांपूर्वी जें होऊन चुकलें, तें पाश्चात्य देशांत आज होत आहे! आतां लोकसंख्या वाढत आहे. तेव्हां त्यांना असा अनुभव येऊं लागला आहे कीं, मांसाहार केला तर माणशी दोन एकर जमीन लागते आणि शाकाहार केला तर एक च एकर जमीन पुरते. दूध सोडून केवळ धान्याहार केला तर अर्ध्या एकरानें हि काम भागेल. पाश्चात्य लोक वैज्ञानिक असल्यामुळें हिशोबी आहेत. ते हळू-हळू मांसाहार सोडण्याकडे येतील असें मला वाटतें. पशु मारून खाणें चुकीचें आहे हें त्यांच्या लक्षांत येईल. परंतु लोकसंख्या जास्त नव्हती तेव्हां च हिंदुस्थानांत ही गोष्ट लक्षांत आली होती.

मीं असें ऐकलें आहे कीं, हिटलरनें हि मांसाहार सोडला होता, कारण मांसाचे डबे दक्षिण अमेरिकेंतून, आणि अर्जेंटिनांतून येत होते. त्या ठिकाणीं बैल मारून त्यांचें मांस टीनच्या डब्यांत भरून बाहेर पाठविलें जाई. सुंदर-सुंदर टिनच्या डब्यांत बसून ते मनुष्याच्या पोटांत प्रवेश करीत!! जर्मनीनें विचार केला कीं, लढाई सुरू झाली तर हे डबे यायचें बंद होईल आणि मग आमची स्थिति बिकट होईल. म्हणून जर्मन लोक शाका-हाराचा प्रयोग करूं लागले. अशा रीतीनें जर्मनीमधें मांसाहार सोडण्याची प्रेरणा परिस्थितिवश झाली. प्रत्येक देशांत योग्य विचार करणारे आणि सत्यशोधन करणारे कांहीं लोक असतात परंतु नाइलाज झाला म्हणजे च जनता त्यांच्यामागें जाते.

शाकुंतलांत एक वाक्य आहे '**आश्रम-मृगः अयम् न हन्तव्यो न हन्तव्यः**' दुष्यंत राजा शिकारीसाठीं अरण्यांत गेला असतां तेथील आश्रमांतला मुलगा निर्भयपणें सांगतो आहे कीं, '**न हन्तव्यो न हन्तव्यः**' हा आश्रमांतला हरीण आहे याला मारूं नकोस. अशा रीतीनें आज कोणत्या देशाचा मुलगा बादशहाला सांगूं शकेल ? परंतु त्या मुलानें तसें सांगितलें आणि दुष्यंतानें त्या हरणाला सोडून दिलें. ही आहे हिंदुस्थानची सभ्यता आणि संस्कृति. या ठिकाणीं ब्रह्मविद्या होती म्हणून असें घडलें. मांसाहार-परित्यागाचा प्रयोग हि ब्रह्मविद्येमुळें च झाला. कारण ब्रह्मविद्या सांगते कीं आपण सर्व आत्मरूप आहोंत. म्हणून कोण कोणाला खाणार ?

**गांधीजीसारखे अंकुर**

हिंदुस्थानांत गांधीजीसारखे सत्पुरुष जन्माला येतात ही विशेष गोष्ट नाहीं. हिंदुस्तानच्या भूमींत च असे अंकुर फुटण्याची शक्ति आहे. लोक हिंदुस्थानच्या स्वतंत्रतेच्या चळवळीचा इतिहास लिहूं पाहतात. जुनीं कागदपत्रें धुंडाळून कोणीं काय केलें किती केलें हें पाहतात. अरे त्या कागदामधें काय आहे ? हिंदुस्थानचा इतिहास काय कागदावर लिहिला आहे ? तो तर आकाशांत लिहिलेला पाहून घ्या. पहा ते विश्वामित्र, वसिष्ठ, अरुंधति, इत्यादि सप्तर्षि !! सर्व कांहीं तेथें आहे. हिंदुस्थानांत आतांपर्यंत किती-तरी राजे झाले आणि गेले. परंतु लोकांना फक्त राजा राम माहीत आहे. हिंदूंची च अशी स्थिति आहे असें नव्हे. येथील मुसलमानांची हि ही च स्थिति आहे. मी पंजाबकडील मेव मुसलमानांच्या पुनर्वसाहतीचें काम करीत होतों. तेव्हां तेथील मुसलमानांना विचारलें "अकबर बादशाह कोण होऊन गेला हें तुम्हांला माहीत आहे

का ?" ते म्हणाले "नाहीं". मीं पुन्हां विचारलें " तुम्ही अकबराचें नांव ऐकलें नाहीं ?" तेव्हां ते म्हणाले " ऐकलें आहे, **अल्लाहो अकबर, अल्लाहो अकबर**" आहे. हिंदुस्थानच्या मुसलमानांना एक अल्लाहुअकबर माहीत आहे, आणि हिंदूंना राजा राम माहीत आहे. दुसरा राजा आमच्या लोकांना माहीत नाहीं.

येथें वेदापासून उपनिषदांपर्यंत एक प्रवाह चालत आला आहे. बुद्ध, महावीर इत्यादि असंख्य सत्पुरुषांचा तो प्रवाह आहे. त्या च प्रवाहांत गांधीजी आले. त्यांचें येणें अनिवार्य होतें. न येऊन कसें चाललें असतें ? आम्ही त्यांना मोठा महात्मा म्हणतों परंतु त्यांना जाणीव होती आणि तसें ते म्हणत हि होते कीं 'मी कांहीं च नाहीं' आणि तें खरें हि होतें. हिंदुस्थानचा जो सनातन धर्म आहे त्याचा हा परिणाम आहे. आम्ही त्यांत च उत्पन्न झालेले आहोंत. म्हणून मी म्हणतों कीं भारताचे वैशिष्ठ्य म्हणजे येथील तत्त्व-विचार. येथें जें सारस्वत आहे, जें साहित्य आहे, त्यांत जसे उच्च विचार आढळतात तसे जगांत इतर भाषांमधें आढळत नाहींत.

तमिळ कवि सुब्रह्मण्यम् यानें म्हटलें आहे कीं, ' हिमालया-सारखा दुसरा पर्वत नाहीं आणि उपनिषदासारखा दुसरा ग्रंथ नाहीं.' हिमालयासारखी एक च भौतिक वस्तु तुमच्यापाशीं आहे. ही जी अद्वितीय वस्तु तिचें च उदाहरण कवीनें दिलें. दुसऱ्या वस्तु जगांत हि आहेत. म्हणून आमच्या जवळचें उच्च साहित्य ही च आमच्या जवळची श्रेष्ठ वस्तु.

लोक म्हणतात 'संस्कृत ही आतां मृत भाषा झाली.' पण मरणें-जगणें म्हणजे काय ? बीज नाहींसें होऊन मोठा वृक्ष झाला मग बीज मेलें म्हणायचें का ? ज्या बीजांतून मोठा वृक्ष उत्पन्न झाला तें बीज मेलें नाहीं. ज्या बीजांतून वृक्ष उत्पन्न होत नाहीं

तें बीज मेलेलें, निर्जीव, समजायचें. हिंदुस्थानच्या भाषा संस्कृतांतून उत्पन्न झालेल्या आहेत. संस्कृतच्या बीजांतून च हा विषाल वृक्ष उत्पन्न झाला आहे. म्हणून च येथील प्रत्येक भाषेमधें भक्तीचें साहित्य भरपूर आहे. जी शक्ति बीजामधें होती ती च या भाषां-मधें आली. संस्कृतमधें नाटकें, कादंबऱ्या आहेत तशा त्या जगांतल्या दुसऱ्या भाषांमधें हि आहेत. येथें जसा अद्‌भुत इतिहास लिहिला गेला तसा दुसऱ्या भाषांमधें हि लिहिला गेला आहे. परंतु हिंदुस्थानांत जी ब्रह्म-विद्या निघाली, तिच्या अनेक शाखा पसरल्या, अनेक 'दर्शनें' निघाळीं त्यांची बरोबरी करणारी वस्तु मात्र जगांत दुसरी नाहीं.

ब्रह्मविद्या एखाद्या विशिष्ट भूमींत च असते असें नाहीं. ती सर्व जगाची वस्तु आहे. परंतु हा एक योगायोग म्हणायचा कीं ती विद्या येथें च उत्पन्न झाली. येथें ती कां उत्पन्न झाली, त्याचें कारण मला माहीत नाहीं. ब्रह्मविद्या ही वर्ष दोन वर्षात विकसित होणारी वस्तु नाहीं. तिला विकसित व्हायला हजारों वर्षे लागतात. परंतु हें बीज जगांत पसरणार आहे हें मी पाहून राहिलों आहे. आजचें विज्ञान त्यापुढें केवळ बालक आहे. जसजसें तें प्रौढ होत जाईल तसतसें त्यांतील आत्म्याचें भान होऊं लागेल. आज थोडें भान होऊं हि लागलें आहे. जे आधुनिकतम वैज्ञानिक आहेत. त्यांच्या हें लक्षात येऊं लागलें आहे कीं, कांहीं चेतन वस्तु आहे खरी. साठ वर्षांपूर्वी विज्ञान अंधारांत होतें. तेव्हांचे वैज्ञानिक नास्तिकांप्रमाणें "ईश्वर नाहीं च" असें म्हणत नव्हते. वैज्ञानिक नास्तिक नसतात, नम्र असतात. ते इतकें च म्हणत कीं ईश्वराच्या बाबतींत आम्ही कांहीं सांगूं शकत नाहीं. परंतु आतां ते म्हणूं लागले आहेत कीं या विज्ञानाच्या मुळाशीं कांहीं मूलतत्त्व असलें

पाहिजे. माझा तर विश्वास आहे कीं हिंदुस्थानांतील सर्वच्या सर्व ब्रह्मविद्या विज्ञानाच्या साह्यानें सिद्ध होणार आहे.

**ब्रह्मतत्त्व सर्वत्र आहे**

हल्लीं कांहीं लोक म्हणतात " श्रद्धा नाहींशी होत चालली आहे. " मी म्हणतों " विज्ञानामुळें आतां श्रद्धेची आवश्यकता च राहणार नाहीं. मानवाला स्वत:ला च अनुभव येईल; आणि कळेल कीं सर्व जगामधें ब्रह्मतत्त्व भरलेलें आहे. आज विज्ञान आणि गणित यांमुळें ब्रह्मविद्येचें जितकें स्पष्ट दर्शन आपल्याला होतें तितकें प्राचीनकाळीं होत नसे. त्यांना स्थूल दृष्टांतांचा आधार घ्यावा लागत होता. उपनिषदामधें गोष्टी येतात. बाप मुलाला ज्ञान देतो आहे. वटवृक्षाचा दृष्टांत घेऊन पिता सांगतो कीं लहानशा बीजापासून च विशाल वटवृक्ष उत्पन्न होतो. त्या लहानशा बीजांत वटवृक्ष प्रकट दिसत नसला तरी तो सगळा त्यांत लपून राहिलेला असतो. त्या प्रमाणें आत्म्याचें स्वरूप असतें. म्हणून हे वत्सा, श्रद्धा ठेव. "**श्रद्धस्व सौम्य.**" म्हणजे शेंवटी त्याला '**श्रद्धस्व सौम्यः**' म्हणावें च लागतें. परंतु आज आपल्याजवळ सूक्ष्म उदाहरणें आहेत. हें ॲटमचें युग आहे असें म्हटलें जातें. परंतु ॲटममुळें ब्रह्म-विद्या स्पष्ट होईल. चैतन्यशक्ति कणाकणांत प्रवेश करूं शकते याचें साक्षात् दर्शन होईल. पूर्वी आत्म्याचें दर्शन होत नसे किंवा तो कानानें ऐकूं येत नसे. '**आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मंतव्यः**' परंतु त्यांना अत्म्याचें द्रष्टव्य आणि श्रोतव्य स्वरूप माहीत नव्हतें. आत्मा डोळ्यांनीं दिसावा, कानांनीं ऐकूं यावा अशी त्यांची आकांक्षा होती. परंतु आतां आत्मा डोळ्यांनीं दिसूं लागेल आणि कानांनीं ऐकूं येईल.

आतां रेडिओ निघाला आहे. आणखी हि बऱ्या च वस्तु निघाल्या आहेत. आम्ही गांधीजींच्या व्याख्यानाची ध्वनि-मुद्रिका ऐकतों. त्यांचा आवाज ओळखतों. म्हणजे मेल्यानंतर हि आवाज ऐकूं येऊं शकतो आणि ओळखूं येऊं शकतो. याचा अर्थ असा कीं, शब्द व्यापक आणि नित्य आहे. तो नित्य आहे कीं अनित्य आहे याबद्दल मीमांसकांमधें मोठा वाद चालत असे. परंतु आज शब्द नित्य आहे ही गोष्ट सिद्ध झाली आहे. तो पकडायची युक्ति आपल्याला माहीत झाल्यामुळें आपण तो पकडूं शकतों. याचा अर्थ असा कीं, श्रवणाच्या पलीकडची अशी एक शक्ति आहे ती आमच्या हातीं आली आहे. अशा च रीतीनें डोळ्याच्या शक्तीबाबत हि होईल. विज्ञानामुळें आम्हांला सृष्टीमधें च आत्म्याचें साक्षात् दर्शन होईल. जें जें साहित्य येथें निर्माण झालें त्यांत आत्मविद्या प्रकट झाली या बद्दल आम्हांला अभिमान वाटतो.

### भूदान आणि राजकारण

भूदानाकडे तुम्ही राजकीय किंवा सामाजिक अशा सामान्य दृष्टीनें पाहूं नका. राजकारणावर त्याचा प्रभाव पडणार आहे यांत शंका च नाहीं. भूदानामुळें राजनीतीची जागा लोकनीति घेणार आहे; असा माझा दावा आहे. परंतु हे सर्व दावे गौण आहेत. माझा मुख्य दावा हा आहे कीं, ब्रह्मविद्येमुळें हिंदुस्थानच्या वातावरणांत जी अहिंसा आहे तिचें दृश्य स्वरूप भूदान-यज्ञांत प्रकट होत आहे.

### वाणीचा उच्चार

बंगालमधें ताराशंकर वंद्योपाध्याय यांना मीं म्हटलें "तुमच्यापासून मला वाक्‌दान पाहिजे" त्यांनीं संपत्तिदान दिलें

होतें. मीं म्हटलें "तुम्हीं संपत्तिदान दिलें तें ठीक च केलें. जी वस्तु तुमच्याजवळ पडून होती आणि जिचा तुम्हांला कांहीं उपयोग नव्हता ती तुम्हीं देऊन टाकली हें चांगलें च झालें. परंतु मला वाक्‌दान द्या" स्वच्छ निर्मळ वाक्‌शक्ति ही फार मोठी शक्ति आहे. शेंवटीं तुम्हीं या जमिनींत च उत्पन्न झालेला आहांत. तेव्हां जाल कोठें ? हिंदुस्थानचा जो मूळ झरा आहे तो सोडून तुम्ही कोठें जाल ? भारतीय शब्द च तुम्ही वापरणार आहांत. त्या शब्दांकडे बारकाईनें पहा तर खरें ! किती खुबी आहे. 'पाणी' शब्द घ्या किंवा 'झाड' शब्द घ्या. झाडाला इंग्रजीमधें 'ट्री' हा एक च शब्द आहे. परंतु आमच्या भाषेंत झाडाला पांच पन्नास शब्द आहेत. कोणी म्हणेल पन्नास शब्दांची गरज काय ? निष्कारण परिग्रह कशासाठीं ? परंतु आपल्या भाषेंत झाडाला जे पन्नास शब्द आहेत ते त्या वस्तूकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहून बनलेले आहेत. 'पृथ्वी' शब्दासाठीं इंग्रजींत 'अर्थ' हा एक च शब्द आहे. 'अर्थ' या शब्दामधें हि कांहीं अर्थ आहे. अर्थमती हा हि पृथ्वीचा अर्थ आहे. परंतु "पृथ्वी" म्हणजे पसरलेली. पृथ्वीसाठीं दुसरा शब्द आहे 'धरा'. 'धरा' म्हणजे धारण करणारी. तिसरा शब्द आहे 'गुर्वी,' म्हणजे जड, वजनदार. चौथा शब्द आहे 'उर्वी,'--म्हणजे व्यापक. पांचवा शब्द आहे 'क्षमा'; म्हणजे सहन करणारी. अशा रीतीनें एका च पृथ्वीसाठीं अनेक शब्द आहेत. पृथ्वीकडे पूर्वींचे लोक परमात्म स्वरूपानें पाहत होते असा याचा अर्थ आहे.

**सर्व सृष्टीमधें चैतन्य आहे**

परमेश्वराचे जे गुण प्रकट झालेले दिसतात त्या गुणानुसार एका च वस्तूला वेगवेगळीं नावें ते देत. कवीला लिहिण्यास सोपें

जावें या साठीं वेगवेगळीं नांवें ते देत नसत. त्यांना एका च वस्तूंत अनेक गुण दिसत. साऱ्या सृष्टींत ते चेतन पाहत. चैतन्यांत जसे अनेक गुण असतात तसे पदार्थांत हि असतात. म्हणून एका च पदार्थासाठीं पन्नास शब्द बनविले गेले. त्या शब्दांच्या आधारें च तुम्ही लिहिणार. तुम्ही किती हि मागासलेले असलांत तरी तुम्ही जें लिहाल त्यांत आत्मविद्येचें प्रकाशन तुम्हांला न कळत होणार च. मग तुमची इच्छा असो अथवा नसो. तें तुम्ही टाळूं शकत नाहीं. माझी तुमच्यावर श्रद्धा आहे, कारण तुम्ही '**अमृतस्य पुत्राः**' आहांत. तुम्ही किती हि मृतवत् बनलांत तरी तें अमृत जाईल कोठें ?

बालेश्वर (उत्कल)

६–२–५६

---

: ७ :

# हृदयाशीं हृदय जोडा

तुकारामाचें एक वचन आहे. देवाला उद्देशून तो म्हणतो, 'तुझ्या नांवाचा महिमा तूं ओळखीत नाहींस; आम्ही ओळखतों.' त्याप्रमाणें साहित्यिकांचा महिमा साहित्यिक ओळखीत नाहींत. अभिमानी साहित्यिकांना आपल्या साहित्याचा अभिमान वाटत असेल परंतु साहित्याचा महिमा मात्र ते जाणत नाहींत. ते जर महिमा जाणते तर अभिमान राखते ना. साहित्याचा महिमा विशाल आहे. मी साहित्यिक नाहीं म्हणून च मला साहित्याच्या महिम्याचें भान आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं जो साहित्यिक नसतो त्याला च त्याच्या महिम्याचें भान असतें. परंतु अनेक भाषांतील साहित्याची

गोडी चाखण्याची मला संधि मिळाली आणि त्या त्या भाषेंतील विशेष साहित्य च माझ्या वाचनांत आलें. त्याचा माझ्यावर खोल परिणाम झाला आहे. म्हणून मी जेथें जेथें जाईन तेथील साहित्यिकांना बोलवीत जावें ही बिहारच्या बेनीपुरीजींची सूचना मला एकदम पटली.

## साहित्य म्हणजे अहिंसा

मला व्याख्या करण्याची हौस आहे. साहित्याची व्याख्या करायची तर 'साहित्य म्हणजे अहिंसा' अशी मी करतों. हें ऐकून लोक म्हणतील याला वेड लागलें. जेथें तेथें हा अहिंसा आणतो. परंतु साहित्यकारांनीं हि सर्वोत्तम साहित्य हें 'सूचक' असतें अशी च व्याख्या केली आहे. सूचक साहित्याला सर्वोत्तम कां मानलें जातें ? ऐकणारांवर तें आक्रमण करीत नाहीं म्हणून. एखाद्यावर जर उपदेशाचा मारा होऊं लागला तर तो उपदेश हितकर असून हि त्याचा स्पर्श सुखद होत नाहीं. लहानपणीं मी इसापाच्या गोष्टी वाचीत असे. गोष्टीचें तात्पर्य खालीं दिलेलें असें. तात्पर्य म्हणजे न वाचायचा भाग असें आम्ही समजत असूं. कथेचें तात्पर्य जर थोडया शब्दांत मांडतां आलें तर कथा लिहिणाऱ्यांत कलेची उणीव होती असें मी म्हणेन. बेनीपुरीजी मला म्हणाले होते कीं, 'भूदान-यज्ञ' हा शब्द कोणाच्या साहित्यांत किती वेळां आला यावरून त्या व्यक्तीचें साहित्य भूदान-यज्ञाला सहाय्यक आहे किंवा नाहीं हें लोक ठरवितात. अमक्याच्या साहित्यांत पन्नास वेळां भूदान शब्द आला तमक्यांच्या साहित्यांत पांचशें वेळां तो शब्द आला अशासारखी सूचि बनवून मोजदाद करतात.

विश्रांतीची गरज असते. त्या ठिकाणीं श्रम आणि विश्रांति परस्पर विरोधी असतात. मनुष्य श्रमानें थकल्यावर विश्रांति घेतो. आणि विश्रांतीनें थकल्यावर पुन्हां श्रम करूं लागतो. विश्रांतीचा हि थकवा येतो. परंतु साहित्याची खुबी अशी आहे कीं, त्यांत श्रम आणि विश्रांति दोन्ही एका च वेळीं लाभतात. चोवीस हि तास काम आणि चोवीस हि तास आराम, ही आहे साहित्याची खुबी. साहित्याचें चित्तावर ओझें होत नाहीं.

**साहित्याचें सर्वोत्तम प्रतीक**

साहित्याची सर्वोत्तम संज्ञा, तिचा सर्वोत्तम संकेत, मला आकाशामध्यें दिसतो. आकाशदर्शनानें कोणाला हि थकवा वाटत नाहीं. मोकळें आकाश निरंतर आपल्या डोळ्यासमोर असतें. परंतु डोळे थकले असें कधीं वाटत नाहीं. साहित्य हें आकाशाप्रमाणें व्यापक, अविरोधी आणि गति देणारें असतें. असें असून तें भरीव असतें. हें हि आकाशाचें च वर्णन आहे. आकाश नाहीं अशी कोणती च जागा नाहीं. जिथें घन वस्तु असते तिथें हि आकाश असतें, आणि जिथें घन वस्तु नसते तिथें हि आकाश असतें. घन वस्तु मापण्याचें तें च साधन आहे. आगगाडीमध्यें आपण बसायला जातों तेव्हां आंतले प्रवासी म्हणतात, 'येथें जागा नाहीं.' त्याचा अर्थ असा कीं जागा आहे पण ती भरलेली आहे. आकाश असें व्यापक असतें. साहित्याचें स्वरूप हि आकाशासारखें च व्यापक असतें. म्हणून आकाश च साहित्याचें सर्वोत्तम प्रतीक आहे.

साहित्य-सेवनानें थकवा येतां कामा नये. आपण सुंदर, गोड गाणें ऐकलें तर, 'आतां पुरें.' असें म्हणत नाहीं. 'आतां पुरे' असें म्हणावें लागलें कीं समजावें ती वस्तु थकवा देणारी आहे.

साहित्यामधें हि 'आतां पुरे' असें वाटलें तर तिथें साहित्याची शक्ति कमी पडली, पूर्ण प्रकट झाली नाहीं, असें समजावें.

पुष्कळांना सुगंध आवडतो. दुर्गंध त्रासदायक वाटतो. परंतु मला सुगंधाचा हि त्रास होतो. कोणता च गंध नसला तर च चित्त प्रसन्न असतें. ही गोष्ट विचित्र वाटेल. परंतु ज्या बगिच्या-मधें अनेक प्रकारचीं सुगंधीत फुलें असतात तेथें क्लोरोफॉर्म-सारखा कांहींसा परिणाम मनावर होतो. चिंतन अस्पष्ट होतें, मंद पडतें, बुद्धीला थकवा येतो. सुगंधाचे परमाणु नाकांत शिरतात. नाकांतील पडद्याचा संबंध मेंदूशीं जोडलेला असतो. त्या पडद्याला सुगंधाच्या कणांचा स्पर्श झाला कीं, चिंतनामधें एक प्रकारचा मंदपणा येतो. निर्गंध जागीं थकवा येत नाहीं. रंगाची हि अशी च स्थिति आहे. कांहीं रंग कांहीं लोकांना प्रिय असतात. परंतु ते च रंग नेहमीं समोर राहिले तर थकवा येतो. परंतु आकाशाच्या रंगानें थकवा वाटत नाहीं. म्हणून ईश्वराचा नीलवर्ण मानला गेला आहे. आकाशाच्या नीलवर्णाने कधीं थकवा येत नाहीं.

### साहित्य कामधेनूसारखें

साहित्याचा परिणाम नेहमीं अनुकूल झाला पाहिजे, अशी आणखी एक साहित्याची व्याख्या आहे. साहित्यामधें प्रतिक्षणीं नवीन अर्थ देण्याची क्षमता असेल तर च असें घडून येईल. ज्याला दूध आवडतें त्याला गाय आवडते. परंतु दूध न देणारी गाय आवडत नाहीं. परंतु ज्याला दूध च आवडत नाहीं, त्याला दूध देणारी गाय हि आवडणार नाहीं. परंतु इच्छित वस्तु देणारी एखादी कामधेनु असली तर मात्र ती सर्वांना आवडेल. साहित्य ही अशी कामधेनु आहे. तिच्यांतून इच्छेनुसार हवें तें मिळून जाते.

## 'द' चा माझा अर्थ

उपनिषदामध्यें 'द' ची गोष्ट आहे. एका च 'द' अक्षराचे दम, दान आणि दया असे तीन अर्थ केले आहेत. देव, मनुष्य आणि असुर या तिघांनीं आपल्या भूमिकेनुसार बोध घेतला. 'द' चा अर्थ माझ्यासाठीं कोणता असा मी विचार करूं लागलों. मी जरी हिंदीमध्यें बोलतों आहे तरी माझें मन मराठी च आहे. म्हणून मी मराठींत विचार करीत असतों. तेव्हां मी विचार करूं लागलों कीं, विन्यासाठीं 'द' शब्दाचा काय अर्थ होऊं शकतो. असुरांसाठीं 'द' चा अर्थ 'दया' झाला, देवांसाठीं 'दमन' झाला, विन्यासाठीं 'द'चा अर्थ 'दगड' आहे. 'दगड' म्हणजे 'पत्थर' हा अर्थ देवांना माहीत नव्हता, असुरांना माहीत नव्हता, किंवा उपनिषदकारांना हि माहीत नव्हता. कारण 'द' म्हणजे 'दगड' हा शुद्ध मराठी अर्थ आहे. मीं दगडासारखें, पत्थरासारखें बनून जावें. कोणी पन्नास हजार घाव घातले तरी हरकत नाहीं. दगड मूर्ति हि होऊं शकतो आणि ठोकर हि देऊं शकतो. असा सगळा 'द' चा अर्थ मला माहीत होता. म्हणून हा अर्थ सुचल्याबरोबर मला फार समाधान झालें.

## स्वल्पाक्षर साहित्यिक

उत्तम साहित्याचे शब्द स्वल्पाक्षर असतात. पाणी घालून पातळ केलेले नसतात. ते स्वल्पाक्षर असल्यामुळें थोड्या अक्षरांत अधिक सूचकता असते. सहज बोध मिळावा अशी अनाक्रमणशीलता त्यांत असते. एखाद्याला बोध घ्यायचा असेल तर घ्यावा, नसेल घ्यायचा तर घेऊं हि नये. बोध घेतला च पाहिजे अशी नेहमीं सक्ति झाली तर पंचाईत च व्हायची. समयानुकूल बोध मिळो कीं न मिळो, परंतु जें नेहमीं प्रिय वाटतें तें च उत्तम साहित्य.

**कवीची व्याख्या**

एकदां मी बरा च आजारी होतों. त्यावेळीं कधी रामाचें नांव घेई तर कधीं आईचें नांव घेई, माझी आई त्यावेळीं जिवंत नव्हती. मी विचार करूं लागलों, जी आई जिवंत नाहीं आणि मला होत असलेला त्रास दूर करायला येऊं शकत नाहीं, तिला हांका मारण्याचा काय उपयोग? परंतु आई मेल्यानंतर हि 'आई' या शब्दाच्या उच्चारानें मुलाला आजारांत समाधान होतें आणि त्या एका शब्दानें च त्याचें काम होऊन जातें, असा हा 'आई' शब्द म्हणजे काव्याची परिसीमा आहे.

असे शब्द आमच्या भाषेंत पुष्कळ आहेत. म्हणून येथील लोक इच्छा नसतां हि कवि बनतात. ते शब्द च असे आहेत कीं, त्यामुळें अनेक प्रकारची प्रेरणा मिळते. मला वाटतें भारतीय भाषांमधें जितकी काव्यशक्ति आहे तितकी जगांतल्या दुसऱ्या भाषांमधें नाहीं. हां, अरबी आणि लॅटिन भाषामधें मात्र तशी शक्ति आहे. संस्कृतमधें तर ही शक्ति खूप च आहे. कारण ती भाषा अत्यंत प्राचीन काळीं निर्माण झाली. आज ज्या प्रमाणें मनुष्य स्पष्ट विचार करूं शकतो तसा त्या काळीं करूं शकत नव्हता. आणि मनुष्य जेव्हां अस्पष्ट रूपांत विचार करतो तेव्हां खूप च विचार करतो. जेथें स्पष्ट विचार असतो तेथें विशिष्टता येते आणि व्यापकता कमी होते. स्वप्नामधें स्पष्टता असत नाहीं. म्हणून स्वप्नामधें जी विविधता असते ती जगांतल्या विविधतेपेक्षां पुष्कळ जास्त असते. सृष्टीमधें असलेलें स्वप्नांत असतें. आणि सृष्टीमधें नसलेलें हि स्वप्नांत असतें. स्वप्नाच्या पोटांत जागृति असते. कवीची सर्व सृष्टि स्वप्नमय असते त्याचें चिंतन सूक्ष्म, अव्यक्त आणि अस्पष्ट असतें.

व्यावहारिक भाषेमधें म्हणायचें तर कवि म्हणजे मूर्ख. कुराणांत महंमद पैगंबरांनीं अनेक ठिकाणीं म्हटलें आहे 'मी कवि थोडा च आहे ?' त्यांनीं असें कां म्हटलें, हें माझ्या लक्षांत येत नव्हते. पण नंतर 'मी कवि थोडा च आहे, जो बोलतो एक आणि करतो एक' असें त्यांचें एक वचन मला सांपडलें. कुराणांत पुष्कळ काव्य आहे असें म्हटलें जातें. अरबी साहित्यांत कुराण सर्व-श्रेष्ठ साहित्य ग्रंथ मानला जातो. ही केवळ काल्पनिक गौरवाची गोष्ट नाहीं. किंवा कुराण धार्मिक ग्रंथ आहे म्हणून असें म्हटलें गेलें असें हि नाहीं. आधुनिक अरबी साहित्याला कुराणाकडून च स्फूर्ति मिळत आहे, असें असून हि पैगंबरांनीं म्हटलें कीं, 'मी कवि थोडा च आहे, जो बोलतो एक आणि करतो एक.' याचा अर्थ मीं असा लावला कीं "मी जें बोलेन तें च करीन" असें त्यांना म्हणायचें आहे म्हणून ते म्हणतात कीं "मी कवि नाहीं." ही कवींची निंदा मानण्याऐवजीं मीं त्या वचनांतून अधिक सुंदर अर्थ असा काढला कीं महंमदाला असें म्हणायचें आहे कीं, "लोकांना बोध व्हावा म्हणून त्यांच्यापुढें मी स्पष्ट चिंतन मांडणार आहें."

कवीचें चिंतन नेहमीं अस्पष्ट असतें. त्याच्या काव्याची खोली त्याला स्वतःला च कळत नाहीं. त्याच्या कवितेवर परस्पर विरोधी भाष्य करणें शक्य असतें. एखाद्या कवीनें आपल्या कवितेवर जर भाष्य लिहिलें तर त्याच्या अगदीं विरुद्ध भाष्य मी लिहूं शकेन आणि कदाचित्, लोकांना माझें च भाष्य आवडेल आणि संभवतः त्या कवीला हि तें अधिक आवडेल. कवीला जें सुचतें तें त्याच्या चिंतनाच्या बाहेरचें असतें. त्याला तें सहज प्राप्त झालेलें असतें. तो कांहीं तें बनवीत नाहीं, किंवा कांहीं रचीत नाहीं. त्या वस्तूचें ओझरतें दर्शन त्याला होतें. कवीला क्रांतदर्शी म्हणतात : '**कविः**

**क्रांतदर्शी'** कवि दूरचें पाहतो असा कांहीं लोक त्याचा अर्थ करतात. तो अर्थ हि ठीक आहे. परंतु त्याचा हा हि अर्थ आहे कीं कवीला फार अस्पष्ट दिसतें. जी स्पष्ट वस्तू आहे ती कोणाला हि दिसते. पशूला हि दिसते. असा च पशूचा अर्थ आहे. जो पाहतो तो पशू. **'पश्यति इति पशुः'**, प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय ज्याचा विश्वास बसत नाहीं, चिंतनानें त्याला कळत नाही, तो म्हणतो, पुरावा दाखवा. असे पुराव्यानें मानणारे पशु असतात. कवीमधें पशुत्व नसतें म्हणून त्याच्या वाणींत विविध दर्शन सांपडतें.

बेनीपुरीजी म्हणाले कीं, 'आम्ही भूदान-यज्ञाला मदत करूं इच्छितों.' परंतु साहित्यिक जर खरोखर मदत करील तर ती इतरांना कळणार हि नाहीं. विनोबांना मदत केल्याचें ज्या कादंबरींतून कळून येतें ती कृति मी अयशस्वी मानेन. जिचा पत्ता च लागणार नाहीं ती च खरी मदत. ईश्वराचें असें च असते. तो मदत करीत असतो पण त्याचें भान हि नसतें. तो हाताशिवाय देतो, डोळ्याशिवाय पाहतो, कानाशिवाय ऐकतो, लेखणीशिवाय लिहितो. ज्यानें कांहीं च लिहिलें नाहीं तो च कदाचित् उत्तम कवि असूं शकेल. ज्यानें रद्दी लिखाण केलें तो कसला कवि ? महाकवि तो च कीं, ज्याच्या हृदयांत भरलेलें काव्य तो प्रकट करूं शकत नाहीं.

## 'साहित्य' प्रकाशित होत नाहीं

याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं ज्यानें कांहीं लिहिलें नाहीं तो कवि. एखादा महाकवि असा असूं शकतो कीं, त्याची काव्य-शक्ति फार खोल असल्यामुळें ती प्रकाशांत येत नाहीं किंवा वाणी-मधें प्रकट होत नाहीं. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे, साहित्य प्रकाशित

होत नसतें, हें हि साहित्याचें एक लक्षण म्हणतां येईल. हल्लीं जो तो साहित्य प्रकाशित करूं पाहतो. परंतु साहित्य ही प्रकाशित करण्याची वस्तु च नाहीं.

## सहचिंतन करा

अलीकडे साहित्यिकांना इनाम दिलें जातें. मला हि इनाम मिळालें आहे. मला म्हणजे आमच्या प्रकाशकांना. या दिवसांत कोणाच्या डोक्यावर केव्हां बक्षीस येऊन पडेल तें सांगतां येत नाहीं. परंतु मी साहित्यिकांना मदतीचें आवाहन करतों तेव्हां त्यांनीं माझ्याबरोबर सहचिंतन करावें असें मला म्हणायचें असते. माझ्या चिंतनांत तुम्हीं सहभागी व्हावें, एवढी च माझी मागणी आहे. अशा रीतीनें सहभागी होणें हा मानवाचा स्वभाव च आहे.

आपण आंबा खायला बसतों तेव्हां जवळ बसलेल्या मनुष्याला दिल्याशिवाय आपल्याला खाववत नाहीं. इतकें च काय ? शेजाऱ्याला बोलावून त्याला खाऊं घालतों. जो दुसऱ्याला न बोलावतां एकटा च खातो तो रसिक नव्हे. आपल्या रसास्वादांत जो दुसऱ्याला सहभागी करतो तो च रसिक. म्हणून मी साहित्यिकांना आवाहन करतों तें या साठीं कीं, मी जो रस चाखत आहे तो एकट्यानें चाखत रहावा हें मला आवडत नाहीं म्हणून. तुम्ही रसिक आहांत म्हणून तुम्ही हि माझ्यांत सहभागी व्हा. सहभागी झाल्यानंतर वाटल्यास काव्य लिहा किंवा नका लिहूं, मला मदत च होईल.

ज्यांनीं उत्तम काव्य लिहिलें त्या कविपेक्षां हि ज्यांनीं कांहीं च लिहिलें नाहीं ते जास्त उत्तम कवि आहेत असें मला वाटतें. जगाला माहित असलेले महापुरुष तितकेसे मोठे नाहींत. परंतु जगाला ज्यांचा पत्ता नाहीं ते च महापुरुष वास्तविक मोठे आहेत.

**'अव्यक्त लिंगाः अव्यक्तचाराः'** ज्ञानी पुरुषाचा आचार अव्यक्त असतो. तो ज्ञानी आहे हें लक्षांत हि येत नाहीं. म्हणून माझ्या अनुभवांत तुम्हीं सहभागी व्हावें एवढें च माझें म्हणणें आहे. तसें झाल्यानंतर तुमच्या कृतीचें शब्दांत किंवा अन्य प्रकारांत प्रकाशन होवो कीं न होवो. तें अप्रकाशन देखील माझ्या कार्यांत मदतरूप होईल. म्हणून मीं केलेल्या आवाहनाचा भार वाटण्याचें कांहीं च कारण नाहीं. तसा भार ज्याला वाटेल तो काय साहित्य लिहिणार? साहित्यिक कोणत्या हि प्रकारचा भार उचलणार नाहीं. आणि मी हि त्याच्यावर भार टाकूं इच्छित नाहीं. माझ्या आनंदांत आणि रसस्वादांत मी त्यांना सामील करूं इच्छितों. याचें च नांव साहित्यिकांना आवाहन आणि साहित्यिकांची मला मदत.

बलरामपूरला बंगालचे साहित्यिक जमले होते. त्यावेळीं माझ्यासमोर पांच, सात, नऊ वातींच्या वेगवेगळ्या पणत्या लावून ठेवलेल्या होत्या. त्यांच्याकडे पाहत मी मनांत कल्पना करूं लागलों, हे पांच दिवे म्हणजे जणूं पंचप्राण; सात दिवे म्हणजे सप्तछिद्र; नऊ दिवे म्हणजे नवद्वारें; अकरा दिवे म्हणजे एकादश इंद्रियें. अशा कल्पना करण्यांत दंग झालों असतां त्या कल्पना-तरंगांत च माझी कांहीं काळ समाधि लागली. त्या दिवशींच्या माझ्या भाषणाचा साहित्यिकांवर खोल परिणाम झाला. ते श्रवणांत तन्मय होऊन गेले होते असें मला कळलें. ते नंतर मला म्हणाले "तुमच्या या आंदोलनानें आम्हांला नवजीवन मिळालें." बंगाली साहित्याची सर्व देशांत प्रतिष्ठा आहे. मध्यंतरीच्या काळांत थोडी मंदता आली होती. परंतु आतां पुन्हां जोर येईल. ताराशंकर वंद्योपाध्याय भूदानावर एक कादंबरी लिहीत आहेत असें मीं ऐकलें आहे. मी

तिची प्रतीक्षा करतों आहे असें नव्हें. परंतु चेतन वस्तूचा अव्यक्त-पणें प्रभाव पडतो च हें मला म्हणायचें आहे.

**साहित्य वीणेसारखें आहे**

साहित्याबाबत माझी भावना सूक्ष्म आहे. साहित्य हें वीणे-प्रमाणें मी मानतों. कांहीं लोकांना वाटतें कीं, वीणा जोर-जोरानें वाजविल्यानें श्रोत्यांवर परिणाम होतों. परंतु जे उत्तम कलाकार असतात ते वीणेच्या तारा अशा हळुवार छेडतात कीं जणूं हृदय-वीणा च वाजवीत आहेत. एकदां मीं असें वीणावादन ऐकलें आहे. शांत मंदध्वनि निघत होता. जणूं ओंकाराचा च ध्वनि. अरसिकांना वाटत होतें कीं “ हा माणूस कांहीं वाजवितो आहे कीं नाहीं ? कांहीं च ऐकूं येत नाहीं ” परंतु मला थोडें संगीताचें गम्य असल्यामुळें मला तें ऐकतांना आनंद वाटत होता. लोकांना वाटतें वाजविणारा घामाघूम झाला म्हणजे त्यानें चांगलें वाजविलें. परंतु हा कलाकार मधें च एक तार छेडी थोडया वेळानें दुसरी तार छेडी.

**हृदय-संमेलनाची मागणी**

एकदां एका गुरूकडे एक शिष्य गेला. त्यानें विचारलें ‘आत्मा काय आहे, हें मी जाणूं इच्छितों’ गुरु शांत च राहिले. शिष्यानें दुसऱ्यांदा विचारलें तरी हि गुरु कांहीं बोलले नाहींत. शिष्यानें तिसऱ्यांदा विचारलें. परंतु तिन्ही वेळां गुरु शांत च राहिले. तेव्हां चौथ्या वेळीं शिष्य म्हणाला ‘मीं तीन-तीन वेळां विचारलें तरी तुम्ही उत्तर देत नाहीं.’ तेव्हां गुरु म्हणाले ‘मीं तीन-तीन वेळां उत्तर दिलें तरी तुला समजलें नाहीं ! मीं ज्या रीतीनें उत्तर दिलें त्याहून चांगली रीत दुसरी नाहीं. न बोलण्यानें

ज्याला समजत नाहीं त्याला बोलण्यानें काय समजणार ?" तसें साहित्यिकाला मी म्हणेन, "अरे करंटचा ! न लिहीतां तुला समजलें नाहीं तर लिहिल्यानंतर काय समजणार आहे ?" साहित्यिकांकडून मीं जी मदत मागितली आहे ती केवळ हृदयाच्या सहानुभूतीची मागितली आहे. म्हणून त्याचा भार वाटतां कामा नये. इनाम बिनाम हि माझ्याजवळ मागूं नका. सहजभावानें हृदयाशीं हृदय जोडलें जावें एवढें च मला वाटतें.

पुरी; २६-३-'५६

---

: ८ :

# साहित्यिकांच्या उपजीविकेचा प्रश्न

साहित्य ही एक विचित्र स्वभावाची वस्तु आहे. तिला पोषण दिलें तर सुकून जाते आणि पोषण न दिलें तरी हि सुकून जाते. म्हटल्यास पोषण दिलें जातें, म्हटल्यास दिलें जात नाहीं अशी जी मधली स्थिति तींत च साहित्य जिवंत राहतें.

## साहित्यिकांचें दारिद्र्य

कांहीं मोठे साहित्यिक गरीब होते. तामीलनाडचे भारती अगदीं दरिद्री होते परंतु ते दीन नव्हते. परमेश्वर दारिद्र्य देतो तें आमची कसोटी करण्यासाठीं च देतो. आम्ही दीन बनलों नाहीं म्हणजे त्याच्या परिक्षेंत पास झालों. त्या प्रमाणें च परमेश्वर कोणाला श्रीमंत बनवितो तें हि त्याची परीक्षा घेण्यासाठीं च. गरिबी आणि श्रीमंती दोन्ही ईश्वराच्या देणग्या आहेत. ईश्वर

आपल्याला जें दारिद्र्य किंवा वैभव देतो तें आमच्या परीक्षे-साठीं देतो.

## दरबारी कवींचें साहित्य

ज्याला सरकार किंवा राजदरबार म्हणतात त्यांच्याकडून ज्यांना आश्रय मिळाला त्यांनीं लिहिलेलें सर्वोत्तम साहित्य देखील दुय्यम दर्जाचें आहे, असें मला वाटतें. वाल्मीकि किंवा तुलसीदास दरबारी कवि होण्यासारखे नव्हते. दरबारी कवीचा उत्तम नमुना म्हणजे कालीदास. परंतु कालीदास ही एक छोटी बाग आहे. सुव्यवस्थित सुंदर असली तरी ती बाग च. परंतु वाल्मीकि अरण्य आहे. वन उपवन यांमधें जो फरक असतो तो या दोघांमधें होता. तथापि कालिदास स्वतंत्र वृत्तीचा कवि होता.

## कवि आश्रित असत नाहीं

पूर्वींच्या काळीं कवींना राजाश्रय दिला जात असें आणि त्यांचा आदर केला जाई. परंतु कवि आश्रित मानला जात नसें. उलट कवीनें च आपल्याला आश्रय दिला, असें आश्रय देणारा मानीत असे. कवि आपल्याजवळ राहतो हा च त्याचा उपकार मानला जाई.

कांहीं लोकांचें म्हणणें आहे कीं, रामाची कीर्ति जी इतकी पसरली त्याचें कारण त्याच्याजवळ एक कवि होता हें आहे. वाल्मीकीनें च रामाचें यश पसरविलें. रावण हि मोठा होता. परंतु त्याच्या यशाचा प्रसार करणारा कोणी कवि त्याला मिळाला नाहीं. म्हणजे कवि राजावर अवलंबून नसून राजाचा महिमा कवीवर अवलंबून असतो असा त्यांचा म्हणण्याचा भावार्थ.

**जनतेशीं एकरूपता**

कवीला कारकुनासारखा नोकरीचा आधार मिळाला तर तो आधार त्याचें कवित्व तोडणारा च होईल, असें मानतों. कवीला कारकून बनणें कष्टाचें आहे. परंतु त्याला शेतकरी बनणें कष्टाचें नाहीं. निसर्गाशीं एकरूप होण्याचा धंदा कवीला पाहिजे असतो. मोठे-मोठे जे कवि होऊन गेले ते कुणी शेतकरी होते, कुणी सुतार होते. ते लहान-सहान उद्योग करीत. त्यांतून त्यांना आवक थोडी होई परंतु निष्कारण बुद्धीला त्रास होत नसे. अशा कवींचें च साहित्य फुलतें आणि फळतें. कवीला दहा तास श्रम करावें लागले तर तो दुसरें कांहीं च करूं शकणार नाहीं. ज्याला पैसा पाहिजे तो च दहा तास काम करील. कवीनें चार तास शेतामधें काम केलें तर पुरेंसें आहे. समाज जितका शेतीशीं एकरूप होईल तितकें काव्य वाढेल. कवींची संख्या वाढो किंवा न वाढो, परंतु काव्य मात्र वाढेल.

**कबीर, कबीर कसा बनला ?**

कबीर विणकर नसता तर कबीर झाला नसता. त्या काळीं छापखाना नव्हता. छापखाना नसतां हि कबीराच्या काव्याचा प्रचार झाला, कारण तो जनतेच्या उद्योगाशीं एकरूप झाला होता. आणि म्हणून जनतेचीं सुखदु:खें त्याला कळत होतीं. जनतेच्या हृदयाशीं हि तो एकरूप झाला होता. म्हणून साहित्यिक शेतकरी तरी असेल, एखादा उद्योग करणारा तरी असेल किंवा केवळ जनतेवर निर्भर राहणारा फकीर असेल. अशा फकिराला खायला मिळालें तरी स्फूर्ति असते आणि खायला न मिळालें तरी हि असते. पोटाला मिळालें नाहीं म्हणजे जें दु:ख किंवा करुणा हृदयांत उत्पन्न होते ती हि काव्याला प्रेरक च बनते.

### कवीचा आदर्श

अशा रीतीनें पूर्ण विरक्त किंवा निसर्गोपासक भक्त यापैकीं कांहीं तरी साहित्यिकानें बनलें पाहिजे. जे पूर्ण विरक्त नाहींत आणि निसर्गोपासक हि नाहींत अशा मधल्या लोकांना आश्रयाची गरज असते. परंतु तो आश्रय त्याच्या स्फूर्तीला अवकाश देणारा असावा.

### केवळ सहानुभूति च नाहीं करुणा देखील

आतां जुन्या राजांचे दिवस संपले. आतां जन-सेवेचा काळ आला आहे. म्हणून सेवा करणारांना कांहीं मदत मिळेल. मुख्य मदत जनतेकडून च मिळाली पाहिजे. ज्यांच्याजवळ वाणी, विचार आणि वर्तन तिन्ही आहेत अशा प्रतिभावान् पुरुषांच्या उपजीविके-करितां आम्हीं कांहीं दिलें तर आम्ही त्याच्यावर उपकार करीत नसून ते च आमच्यावर उपकार करतात, अशा भावनेनें समाजां-तल्या दहापांच लोकांनीं एकेका कवीचा भार उचलावा असे दहापांच भक्त हि कवींना मिळूं नयेत का ? परंतु हल्लीं आम्ही कोरडी सहानुभूति दाखवितों. आगगाडीमधें कोणी दुसऱ्याला त्रास देत असला तर आम्ही तमाशा पाहत राहतों. इतर प्रवासी सहानुभूति दाखवितात, परंतु करुणा दाखवीत नाहींत. करुणेमधें कांहीं करण्याची गोष्ट येते, कारण 'कृ' धातूपासून हा शब्द बनला आहे. अशी करुणा आज कोठें दिसून येत नाहीं.

### संपत्तिदान यज्ञ हा या प्रश्नाचें एक उत्तर

म्हणून आमचा संपत्तिदान-यज्ञ फार महत्त्वाचा आहे. परंतु कम्युनिस्ट टीका करतात कीं विनोबांना जमीन नको कीं संपत्ति

नको. त्यांना फक्त कागद हवेत. परंतु मी या कागदांची जितकी किंमत समजतों तितकी संपत्तीची समजत नाहीं. या कागदांत आम्ही दान देणाराकडून असें लिहून घेत असतों कीं जिवंत असे-पर्यंत मी आपल्या कुटुंबासाठीं जो खर्च करतों त्याचा अमुक एक हिस्सा देईन. अर्धें जेवण मिळालें तरी त्यांतला हि एक भाग द्यावा. अर्धपोटी लोकांनीं देखील आपला हिस्सा द्यावा; अशी माझी इच्छा आहे. पैसा दात्याजवळ च राहील. आणि आमच्या निर्देशा-प्रमाणें तो त्या पैशांचा विनियोग करील.

**'ऑनरेरियम' (मानधन) द्यावें**

सर्व संपत्ति माझी आहे आणि ती घरोघर वाटलेली आहे असें मी मानतों. कोणीं सहावा, आठवा किंवा दहावा हिस्सा दिला तरी मला हरकत नाहीं. कुटुंबांत एक व्यक्ति अधिक आहे असें समजून तिच्यासाठीं तितका खर्च करण्याचें कर्तव्य मानलें जाण्याची कल्पना रूढ व्हावी हें मला हवें आहे. ही वस्तु सुरू झाली तर एखाद्या चांगल्या माणसाच्या खर्चासाठीं दहा पांच व्यक्ति आपल्यां-तून कांहीं हिस्सा देतील. त्याचें स्वरूप 'ऑनरेरियम' सारखें राहील म्हणजे सन्मानपूर्वक तें दिलें जाईल. असें झालें म्हणजे घेणारा देखील अयोग्य खर्च करणार नाहीं किंवा जरूरीपेक्षां जास्त घेणार नाहीं. अशा दानानें घेणाराचें जीवन पवित्र होईल आणि देणाऱ्यांचें हि होईल. आदर, कर्तव्य इत्यादि पवित्र भावनेनें च ते दान देतील.

**चार आवश्यक गोष्टी**

म्हणून साहित्यिकांनीं एक तर तुलसीदास, वाल्मीकि यांच्या-सारखें विरक्त कोटींतील पुरुष बनलें पाहिजे तर च साहित्य

पसरेल. दुसरी गोष्ट ही कीं त्यांनीं शेतकरी बनले पाहिजे किंवा लहान-सहान उद्योग केले पाहिजेत. तिसरी गोष्ट ही कीं सरकार-कडून साहित्यिकाला कांहीं मिळालें पाहिजे. परंतु या गोष्टीला वेळ लागेल. चवथी गोष्ट संपत्तिदान ही आहे. ज्या ठिकाणीं पधरा हजार कुटुंबें असतील त्यांनीं आपला पंधरावा हिस्सा दिला तर एक हजार कुटुंबांचें पोषण होईल. समाजाची सेवा करणाऱ्या एक हजार कवींच्या किंवा वैज्ञानिकांच्या कुटुबांना एकटें गयेसारखें शहर हि खाऊं घालूं शकतें. मला ही च प्रवृत्ति वाढवावयाची आहे.

**स्वाभाविक पोषण मिळावें**

कवीला कमी पोषण मिळूं नये किंवा जास्त हि मिळूं नये. त्याला कृत्रिम पोषण मिळतां कामा नये. मुलाला आईचें दूध जसें सहज मिळतें तसें सहज पोषण कवीला मिळावें. आई जर आपलें मांस मुलाला खाऊं घालूं पाहील तर मूल तें खाणार नाहीं. म्हणून कवींनीं पराश्रित असतां कामा नये. कवि पराश्रित झाला तर सुकून जाईल. शरीर, मन आणि प्राण टिकून राहील एवढें च कवीला मिळावें. पूर्वीच्या काळीं भिक्षेची प्रथा असे. परंतु ती वस्तु मला पसंत नाहीं. कारण त्यांत देणारा श्रद्धेनें देत नाहीं. हल्लीं तर भिक्षा देतांना भिकाऱ्याची ब्याद टाळण्याची च वृत्ति असते. शिव्या देत मूठभर धान्य त्याच्या पदरांत टाकतात. म्हणून भिक्षा नको परंतु संपत्तिदान सुरू करा. यांत लहानमोठ्या सर्वांनीं हात-भार लावावा. जो म्हणून खातो त्यानें आपल्या खाण्यांतला एक हिस्सा दिला पाहिजे. या हिश्श्यांतून समाज-सेवकांचें पोषण सहज होऊं शकेल.

: ९ :

# विदग्ध वाङ्मय

ईश्वर आणि त्याची प्रकृति दोन्ही अनादि आहेत. जेव्हांपासून ईश्वर आहे, तेव्हांपासून प्रकृति हि आहे. प्रकृतीचें असणें हें च ईश्वराचें ईश्वरत्व आहे. प्रकृतींतून अनेकविध सृष्टि उगवते. प्रकृतींत ती मावळते. अशा अनेक सृष्टि येतात आणि जातात, प्रकृति कायम राहते. सृष्टीनंतर मनुष्य येतो. सृष्टीचा च तो एक भाग असतो; आणि स्रष्टयाचा हि तो अंश असतो. सृष्टीनें त्याच्या देहाचें धारण होतें, आणि सृष्टीनें च त्याच्या हृदयाचें पोषण होतें. मनुष्यासाठीं अन्नाचें कोठार आणि बोधाचा खजिना अशा दुहेरी रूपानें सृष्टि नटली आहे.

सृष्टि आणि मानव यांच्यांत पडदा नाहीं. मानवाला सृष्टींतून बोध सरळ घेतां येतो आणि तसा तो आजतागाईत घेत आला आहे. हा च बोध वाणींत आला म्हणजे त्याचें वाङ्मय होतें आणि सरस्वतीच्या कृपेनें त्याचें सारस्वत बनतें. सरस्वतीच्या विशेष कृपेला पात्र झालेले थोर पुरुष इतरांच्या लाभासाठीं ग्रंथरूपानें असें सारस्वत सांठवून ठेवतात. मानवाचा हा अमूल्य ठेवा आहे.

एका मानवानें आपल्या अनुभवाचा लाभ आपल्या बंधूंना द्यायचा हें एक दयेचें काम आहे. पण त्याच्या हि मर्यादा आहेत. अमक्या तूं अमुक कर, आणि अमुक करूं नको—असा रोखून बोध करणें हें एक प्रकारचें आक्रमण होतें. असें आक्रमण थोडें फार

आई, बाप, गुरु यांच्याकडून झालेलें माणसाला सहन होऊं शकतें, गोड हि लागतें. तिन्ही नात्यांनीं मानवास बोध करूं शकणारीं हितेच्छु धर्मशास्त्रें अशा रोखीव आणि रेखीव विध्यार्थी आणि आज्ञार्थी बोध करीत असतात, पण इतरांचा तसा अधिकार नसतो. आणि म्हणून वाङमयाची मीमांसा करणारे साहित्यकार बोधाचा मारा करणाऱ्या वाङमयाला, जरी तो बोध समुचित असला तरी, गौण समजतात आणि सूचक साहित्याला प्रथम स्थान देतात. साहित्यकारांची ही एक अहिंसेची सूक्ष्म दृष्टि आहे, असें मी समजतों.

रोखीव, रेखीव किंवा आखीव बोधांत ज्याप्रमाणें दुसऱ्यावर आक्रमण होतें आणि म्हणून त्यांत एक प्रकारची हिंसा होऊं पाहते, त्याप्रमाणें सूचक बोध हि अति गूढांत शिरला म्हणजे माणसाच्या बुद्धीला सतावल्यासारखें होऊन दुसऱ्या प्रकारची हिंसा होऊं पाहते. म्हणून सुचवायचें पण डिवचायचें नाहीं अशी "**मध्यस्थ लिहिण्याची करणी**" अहिंसेंत मुरलेले सरस्वती-पुत्र करीत असतात. असें उभय मर्यादा सांभाळून अवतरणारें तें विदग्ध वाङमय. ज्ञानदेवानें म्हटल्याप्रमाणें "पाणी बुबुळाला हि त्रास देत नाहीं आणि खडकाला हि फोडून काढतें," तसें "**साच आणि मवाळ मितले आणि रसाळ**" असें विदग्ध वाङमयाचें विशुद्ध स्वरूप आहे.

आजच्या घटकेला काव्य, नाटक, कादंबरी, लघुकथा इत्यादि प्रकारांची गणना विदग्ध वाङमयांत केली जाते. पण केवळ अमुक एका आकारांत वाङमय आलें कीं, तेवढ्यानें तें विदग्ध होईल असें नाहीं. लेखनशैलीचे हे प्रकार अहिंसक सूचन-पद्धतीला अनुकूल

होऊं शकतात. म्हणून ते विदग्ध वाङमयांत येऊं शकतात हें खरें. पण काव्य-नाटकादि साहित्य आपोआप विदग्ध होईल च असें नाहीं. काव्य-नाटक-कथादि कितीतरी साहित्य आज असें दाखवितां येईल कीं ज्याची गणना च करायची तर दग्ध वाङमयांत करावी लागेल. कोणतें दग्ध आणि कोणतें विदग्ध याची कसोटी दुसऱ्या कोणीं न केली तरी काल करीत च असतो. उदाहरणार्थ रामायण आणि महाभारत हीं विदग्ध वाङमयाचीं, कालाच्या कसोटीवर उतरलेलीं उत्तम उदाहरणें आहेत. उलट बरींचशीं पुराणें, जरी कथाशैलीनें युक्त असलीं तरी, आज दग्ध होऊन चुकलीं आहेत. लोकांना काव्य-नाटक-कथादि रोचक होऊं शकतें याचा लाभ घेऊन जें भाराभर साहित्य अनेक भाषांत लिहिलें जात आहे, तें सारें दग्ध साहित्य आहे. आज-ना-उद्यां जळून जायचें आहे. जळून जाण्यापूर्वीं अनेकांचीं हृदयें तें जाळून घेत आहे, ही दुःखाची गोष्ट आहे.

लहान मुलाला देखील गोष्टी आवडतात, याचें कारण काय ? लहान मुलाला आईचें बोलणें हि आवडतें, त्याचें कारण काय ? जें ह्याचें तें च त्याचें. प्रेमानें सुचविणें हें दोहींचें कारण. जसें गीतेनें म्हटलें आहे--"**हितार्थ बोलणें सत्य, प्रेमानें न खुपेलसें.**" पण आई तर प्रत्यक्ष बोध हि करूं शकते, आणि तो हि मुलाला रुचतो, इतरांचा प्रत्यक्ष बोध रुचत नाहीं. उलट सूचन हि नेहमीं रुचतें च असें नाहीं. व्याजोक्ति, व्यंगोक्ति, वक्रोक्ति अशा स्वरूपांतलें सूचन हें सरळ हल्ल्यापेक्षां हि अप्रिय होतें. सारांश सूचन म्हटलें कीं तें विदग्ध होईल च असें नाहीं. उलट प्रत्यक्ष बोध हि प्रेमाधिकार-संपन्न असला तर विदग्ध होऊं शकतो.

म्हणून च गीतेसारखे प्रत्यक्ष उपदेश हि विदग्ध वाङ्मयांत मोडतात, इतकें च नव्हे तर विदग्ध वाङ्मयाचे आदर्श ठरूं शकतात. प्रेमानें रिझवून हितोपदेश करण्याचे जे जे प्रकार, मग ते प्रत्यक्ष उपदेशाचे असोत अथवा परोक्ष सूचनाचे असोत, विवेचन-रूप असोत अथवा कथारूप असोत, विदग्ध वाङ्मय होत.

आदर्श विदग्ध वाङ्मयाचें एक बाह्य लक्षण "**आंगें सानें परिणामें थोर**" असें हि ज्ञानदेवानें केलें आहे. वर उद्धृत केलेल्या वचनांत हि "**मितले**" म्हणून म्हटलेलें आहे. माझ्या आवडीला हें लक्षण जुळतें आहे. आमच्या आईनें आम्हांला लहानपणीं सूत्र सांगून ठेवलें होतें--"**थोडक्यांत गोडी.**" मला एकानें विचारलें, "तुमच्या आवडीचीं तीन सर्वोत्तम पुस्तकें कोणतीं ?" मीं सांगितलें, "भगवद्गीता, इसापनीति आणि युक्लिडची भूमिति." ऐकणाऱ्याला हें उत्तर अगदीं च अनपेक्षीत होतें. पण मी हीं तिन्ही विदग्ध वाङ्मयाचीं उत्तम उदाहरणें समजतों. गीतेचा बचाव मीं वर केला च आहे. इसापनीतीच्या बचावाची गरज नाहीं. युक्लिडची भूमिति विदग्ध वाङ्मय कसें ? हें सांगायला पाहिजे. युक्लिड साक्षात उपदेश करीत नाहीं, प्रमेय थोडक्यांत समजावून देतो, आणि नामा-निराळा राहतो. हें सारें विदग्ध लक्षण आहे.

: १० :

# काव्य हा सत्याचा एक प्रयोग

श्री. कोलते यांच्या 'जीवन-गंगा' नामक कविता-संग्रहाला मीं प्रस्तावना लिहावी असा त्यांचा फार आग्रह. आणि त्यांची 'भावार्त' भूमिका लक्षून मी त्या आग्रहाला वश झालों.

**साऱ्या जीवांची एक च तळमळ**

या सबंध कविता-संग्रहांत जरी विचारांचे अनेक प्रदेश ओलांडले गेले आहेत, तरी ईश्वराविषयीं तळमळ हा त्यांतला स्थायी भाव आहे. खरोखर या एका तळमळीशिवाय दुसरी कोणती हि तळमळ कुणा हि जीवाला कधीं लाभलेली च नाहीं. साऱ्या जीवांची एक च तळमळ आहे, एक च धडपड आहे, एक च शेंवटची गति आहे. पण ईश्वर या नांवानें ईश्वराला सारे ओळखत नाहींत, इतकें च. कोणी त्याला संतति नांव देतात, कोणी संपत्ति नांव देतात, कोणी सत्कीर्ति म्हणतात, कोणी सत्ता म्हणतात. कोणी ईश्वर हि म्हणतात. नांव कोणतें हि असलें तरी तळमळीच्या स्वरूपांत फरक पडत नाहीं, पण वृत्तींत अपार फरक पडतो. सगळे जाणून अथवा न जाणून ईश्वराकडे जात आहेत. जे जाणून जात आहेत, ते ज्ञानी ठरले. जे न जाणून जात आहेत, ते अज्ञानी ठरले. कोणी सरळ वाटेस लागले आहेत, ते साधू ठरले. ज्यांनीं वाकडी वाट धरली आहे, ते दुर्जन ठरले. त्यांच्या तळमळीला तृप्तीचीं फळें लागतात, यांच्या तळमळीला वेदनांचे कांटे लागतात.

मला वाटतें अधिक तपस्वी हे च आहेत ; ज्यांनीं आधीं हि ताप सोसावा आणि शेंवटीं हि ताप सोसावा. ह्यांच्या तपस्येची बरोबरी ते कशी करणार, ज्यांनीं आधी किती हि ताप सोसला तरी शेंवटीं मेवा पटकावला ?

## तळमळ एक, तिच्या जाती अनेक

तळमळ ही काव्याची शक्ति आहे. तळमळीच्या अनेक जाती असतात. म्हणून काव्याच्या अनेक जाती झाल्या. पण सर्वत्र तळमळीचें स्वरूप एक च असतें. म्हणून तळमळीच्या काव्याचें रस-स्वादन, मग तें काव्य कोणत्या हि जातीचें असो, मग त्यांची काव्यरुची कोणत्या हि जातीची असो, रसिकांना अवश्य करतां येते. कवीची इच्छा, कशी हि असली तरी रसिकाला आपल्या ह्रौशीचा अर्थ त्यांतून मिळवितां येतो.

भक्तिरसाच्या काव्यांतून शृंगार लाभूं शकतो, आणि शृंगार-रसाच्या काव्यांतून भक्ताला भक्ति लाभूं शकते.

वीर काव्यांत विरक्ताला वैराग्य आढळतें आणि वैराग्यपर कवितेंतून क्षात्रवृत्तीला वीर रस सांपडतो. म्हणून मीं असें ठरविलें आहे कीं काव्याचें स्वरूप लिहिणाराच्या मर्जीवर नसतें, वाचणाराच्या मर्जीवर असतें.

## रस काव्याचा आत्मा

पण लिहिणाराच्या हातांत एक गोष्ट असते. तो नीरस कविता लिहून वाचकाचा विरस करूं शकतो. यानें खुशाल नीरस लिहावें आणि त्यानें सरस वाचावें हें साधायचें नाहीं. यानें शृंगारिक लिहून हि तो भक्तिमय समजूं शकतो. पण यानें नीरस

लिहून हि तो सरस समजूं शकत नाहीं. म्हणून काव्याचें मर्म जाणणारांनीं रस हा काव्याचा आत्मा मानलेला आहे, आणि मला वाटतें, त्यांचें तें कथन बरोबर आहे.

ईश्वराविषयीं कविता लिहिली म्हणजे ती चांगली च, अशी एक जुनी समजूत आहे. पण ती खरी नाहीं. हें कोणी हि अनुभवूं शकतो. मधल्या संतांच्या मानलेल्या युगांत अनेकांनीं ईश्वरावर कविता लिहिली आहे. पण तुकारामासारख्याची कविता जशी हृदयाला भिडते तशी इतर पुष्कळांची भिडत नाहीं, हें आपण पाहतों. याचें कारण एकींत तो रस आहे आणि दुसरींत नाहीं, याशिवाय काय सांगतां येईल ?

**रस म्हणजे तळमळीचा खरेपणा**

पण रस म्हणजे काय ? रस म्हणजे शब्दांची आणि अर्थाची नेटकी योजना किंवा ठाकठिकी नव्हे च. तें बनावटी रंगीत केळें होईल व त्याला सोनकेळीची चव येणार नाहीं. रस म्हणजे तळ-मळीचा खरेपणा. म्हणून मी म्हणत असतों, खरी तळमळ असूं द्या, मग ती बाहृय विषय-वासनेची का असेना, मला चालून जाईल. पण ईश्वराच्या नांवाची हि खोटी तळमळ चालायची नाहीं. परीस लोखंडाचें सोनें करूं शकतो, पण पितळेचें करूं शकत नाहीं. तुमच्या हीन तळमळीचें रूपांतर मी उच्च तळमळींत करूं शकतो, पण तुमच्या खोटयाचें खरें करण्याचें सामर्थ्य मला नाहीं.

**"न ये नेत्रीं जळ,**
**नाहीं अंतरीं तळमळ,**
**हे तो चावटीचें बोल".**

असें जेव्हां तुकाराम म्हणतो तेव्हां त्याला हें च म्हणायचे आहे. सत्य हें जीवन-सार आहे, आणि तो च साहित्य-रस आहे.

**खरेपणा पाहिजे**

लोक विचारतात, 'कवीचें जीवन पुण्यमय असलें पाहिजे काय ?' कुणी याचें आग्रहानें उत्तर देतात--'अवश्य असलें पाहिजे.' दुसरे म्हणतात--'तशी कांहीं गरज नाहीं.' मला कवीचें पुण्यमय जीवन हवें च आहे. पण मी या दुसऱ्या पक्षाला दुजोरा द्यायला हि तयार आहे. मी म्हणतों कवि पापी का असेना, तो खरा पापी असो म्हणजे झालें. चांगला मन लावून पाप करणारा, असला पाहिजे. मधून-मधून पुण्याचा बुरखा घेणारा, पापाचें ढोंग करणारा नाहीं चालायचा. सच्चा निष्ठावान् पापी पाहिजे. तसा असला तर तो वाटल्यास नरकांत जाईल, पण त्याच्या काव्यानें मी मोक्ष गाठूं शकतों.

काव्य हा सत्याचा प्रयोग आहे. ज्याच्या जीवनांत जेवढें सत्य मुरलें असेल तेवढें त्यांत काव्य उमटेल--मग तें काव्य तो शब्दांनीं प्रकट करो अथवा न करो.

श्री. कोलते यांच्या भावनेंत सत्याचा अंश असावा अशी मला शंका आली आहे. ती शंका खरी ठरो आणि त्या अंशाचें संगोपन करून त्याला वाढविण्याची प्रेरणा ईश्वर त्यांना देवो, अशी माझी इच्छा आहे--मग त्यानें त्यांचें लेखन खुंटून का जाईना !

: ११ :

# प्रश्नोत्तरें

: १ :

## साहित्यांत शृंगाराची मर्यादा

**प्रश्न**:——साहित्यांत शृंगार-वर्णनाची मर्यादा काय असावी ? वाल्मीकिसारख्या महाकवीला ऊर्मिलेचें इतकें विस्मरण कसें झालें ?

**उत्तर** :——या प्रश्नाची चर्चा बहुधा बंगालनें सुरू केली. 'विस्मृता उर्मिला' ह्या नांवाचा एक लेख गुरुदेव ठाकुर यांनीं लिहिला होता. वनांत जातांना लक्ष्मण आईला भेटायला गेला परंतु उर्मिलेला भेटला नाहीं. लक्ष्मण संयमी असला तरी त्याला उर्मिलेचें विस्मरण व्हायला नको होतें. असा त्या लेखाचा भावार्थ होता. त्यानंतर कांहीं कवींनीं या प्रसंगाचें वर्णन हि केलें आहे. त्या वर्णनांत अश्लीलता नसेल तर मला कांहीं दोष हि दिसत नाहीं.

परंतु ज्याच्या तोडीचा दुसरा कवि झाला नाहीं अशा वाल्मीकि कवींनीं या प्रसंगाचा उल्लेख हि केला नाहीं तेव्हां हा प्रसंग खरोखर घडला च नसेल का ? घडला असेल, आणि लक्ष्मण उर्मिलेला भेटला हि असेल. परंतु उर्मिलेच्या भेटीला महत्त्व देण्यापेक्षां लक्ष्मणाची अनासक्ति, भक्ति आणि निष्ठा यांना महत्त्व देणें कवीला अधिक योग्य वाटलें असावे. लक्ष्मणाचें वैराग्य दाखविण्याच्या दृष्टीनें च बहुधा कवीनें उर्मिलेशीं झालेल्या भेटीचें

वर्णन केलें नसावें. लक्ष्मण आईला भेटायला गेला तेथून हि जणूं सुटका झाली या भावनेनें आला. आईनें त्याला अडविलें असतें तरी हि तो थांबला नसता. तो रामाचा भक्त होता. परंतु मातृ-प्रेम किती अद्‌भुत असतें हें दाखविण्याकरितां कवीनें त्या प्रसंगाचें वर्णन केलें.

उर्मिला आणि लक्ष्मण यांच्या भेटीचें वर्णन न करतां हि वाल्मीकीनें वर्णन केलें आहे. या वर्णनाच्या अभावांत वाल्मीकीची फार मोठी कला प्रकट होत आहे. बहुधा लोक उत्तान वर्णनाला अश्लील समजतात. तें तर अश्लील आहे च. पण माझ्यामतें सूचन देखील अश्लील आहे. पति-पत्नीचें मर्यादित आणि सूचनात्मक वर्णन देखील लाभदायी आहे असें मला वाटत नाहीं.

संतति-निर्माण हा वैज्ञानिक विषय आहे. तर पति-पत्नींचा संबंध पवित्र आहे. संतानोत्पत्ति धार्मिक भावनेनें च झाली पाहिजे. या बाबतींत दुसरी कल्पना च मी करूं शकत नाहीं. आपण ज्याप्रमाणें भगवंताचें स्मरण करून भूदान-यात्रेला आरंभ करतों तशा पवित्र भावनेनें पति-पत्नींचा संबंध झाला पाहिजे. आणि समागम विफल झाला, तर त्याचें दोघांना हि दुःख झालें पाहिजे. शेतकरी केवळ कर्तव्य म्हणून नाइलाजानें दुसऱ्यांदा पेरणी करतो. पहिली पेरणी व्यर्थ गेली तर त्याला दुःख झाल्याशिवाय राहत नाहीं, तसें संतति निर्माण करण्यासाठीं दुसऱ्यांदा स्त्री-समागम करावा लागला तर पुरुष तो करील, परंतु दुःखी अंतःकरणानें; केवळ कर्तव्य म्हणून करील. या विषयासंबंधीं अशी भावना निर्माण करणें साहित्यिकांचें काम आहे. पण आधीं साहित्यकारांच्या जीवनांत ती वस्तु प्रकट झाली तर च तें शक्य आहे.

: २ :

## भूदान आणि साहित्यकार

**प्रश्न** :—भूदान-यज्ञाचें बाबतींत तुम्ही साहित्यकाराकडून काय अपेक्षा राखतां ?

**उत्तर** :—भूदान-यज्ञाच्या वैचारिक भूमिकेचा प्रचार करण्याचें कामीं साहित्यकार बरा च हातभार लावूं शकतात. हें कार्य इतकें स्फूर्तिदायी आहे कीं, त्यांतून एखादें रामायण सहज प्रकट होऊं शकेल.

: ३ :

## साहित्यसेवी महिला आणि सेवा-कार्य

**प्रश्न** :—साहित्यसेवी स्त्रिया रचनात्मक कार्यांत प्रत्यक्ष भाग घेऊं शकणार नाहींत काय ?

**उत्तर** :—कां घेऊं शकणार नाहींत ? त्या जर रचनात्मक कामांत भाग घेतील तर किती चांगलें होईल ! तसें झालें तर त्या वाल्मीकि बनल्या आणि रामाच्या सेवेंत हि दाखल झाल्या असें होईल.

शहरांत कितीतरी स्त्रिया दु:खी, आजारी आणि बेकार असतात. त्यांच्याकडे जाऊन त्यांची सेवा या महिलांनीं केली पाहिजे. मला आठवतें कीं माझी आई कोणाच्या घरीं सैंपाकाची अडचण असली तर त्यांच्या घरीं जाऊन त्यांचा सैंपाक करून देई. घरचा सैंपाक आधीं करून ठेवी. मीं विचारलें "असा स्वार्थ कां ? घरचा सैंपाक आधीं करतेस आणि नंतर त्यांचा करतेस ?" आईनें उत्तर दिलें

'हा स्वार्थ नसून परमार्थ आहे. त्यांच्या घरचा सैंपाक आधीं करून मग घरचा केला तर जेवायच्या वेळीं तुम्हांला गरम-गरम पदार्थ मिळतील. परंतु त्यांना जेवण्याच्या वेळीं सकाळीं करून ठेवलेला थंड सैंपाक खावा लागेल,' हें उदाहरणादाखल मीं सांगितलें. स्त्रियांना पुरुषांनीं थोडी फुरसत दिली तर त्या किती काम करूं शकतात हें या उदाहरणावरून लक्षांत येईल. आणखी एक काम त्या करूं शकतात. एखाद्या हरिजनाच्या मुलाला आपल्याजवळ ठेवून घेऊन पुत्राप्रमाणें जर त्याला लहानाचा मोठा केलें तर हें कार्य एखादें हरिजन छात्रालय चालविण्यापेक्षां हि जास्त महत्त्वाचें आणि क्रांतिकारी आहे. याशिवाय चरखा आणि चक्की यांच्या द्वारां घरांत ग्रामोद्योगाचें आणि परिश्रम-निष्ठेचें वातावरण त्या उत्पन्न करूं शकतात. त्यांच्या प्रतिभेचा विकास होण्याला हीं कामें उपयोगी पडतात असें च त्यांना दिसून येईल. स्त्रियांनीं सार्वजनिक कामांत भाग घ्यायचा म्हटलें तर पुरुषांनीं त्यांच्या घरच्या कामाला हातभार लावला पाहिजे. आज उत्तर-प्रदेशांत तर असें दिसतें कीं पुरुषांनीं स्त्रियांना गुलाम च करून ठेवलें आहे.

: ४ :

# साहित्याच्या द्वारें चरितार्थ साधन

**प्रश्न** :—साहित्याच्या द्वारें उपजीविका चालविणें उचित आहे का ?

**उत्तर** :—आपण सीझरचा हिस्सा सीझरला आणि परमेश्वराचा हिस्सा परमेश्वराला दिला पाहिजे. शरीराला पोषण दिलें च पाहिजे. परंतु आत्म्याला हि पोषण मिळालें पाहिजे. एखादा

माणूस आपलें सर्व समाजाला अर्पण करून समाजाकडून जें सहज प्राप्त होईल त्यांत च समाधान मानत असेल तर तें फार च चांगलें आहे. परंतु एखादा मनुष्य साहित्याच्या द्वारें एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आपली उपजीविका मिळवीत असेल तर त्यांत हि दोष नाहीं.

: ९ :

# दक्षिणेकडील एक भाषा शिका

**प्रश्न** :—राष्ट्रभाषेसंबंधीं कांहीं सांगा.

**उत्तर** :—आतां हिंदी आपण राष्ट्रभाषा ठरविली आहे. त्यामुळें दुसऱ्या प्रांतांतील लोक हि हिंदी शिकूं लागले आहेत. आतां हिंदी भाषा जाणणारे फक्त उत्तर भारताचे लोक च राहणार नाहींत. दक्षिणेकडच्या लोकांना हिंदी शिकायला किती परिश्रम पडतात याची कल्पना आपण उत्तरेकडील लोक करूं शकणार नाहीं. हिंदीमधें जे लिंग-भेद आहेत ते दक्षिणेकडील भाषांत मुळीं च नाहींत. तिकडे चेतन-अचेतन हा हि भेद नाहीं. म्हणून जेव्हां हिंदीवाले भिंतीला स्त्रीलिंग आणि दगडाला पुल्लिग समजतात तेव्हां दक्षिणेकडील लोक घाबरून च जातात. ‘कटोरी’ सारख्या लहान वस्तूला स्त्रीलिंग म्हणायचें आणि ‘कटोरा’ सारख्या मोठ्या वस्तूला पुल्लिग म्हणायचें असें म्हटलें तर भिंत मोठी असते आणि दगड लहान असतो. इंग्रजीमधें असा लिंग-भेद नसल्यामुळें त्यांची अडचण अधिक च वाटते.

म्हणून आमचे हिंदी साहित्यिक दक्षिण भारतांतील एखादी भाषा शिकतील तर फार चांगलें होईल. विशेषतः मी त्यांना

तमिळ शिकण्याची शिफारस करीन. ही भाषा दोन हजार वर्षांची जुनी आहे. या भाषेचें सुंदर व्याकरण उपलब्ध आहे. हिंदी, मराठी वगैरे भाषांचें व्याकरण शें-दीडशें वर्षांचें आहे. परंतु तमिळ भाषेचें व्याकरण कमींत कमी एकूणीसशें वर्षांचें जुनें आहे. तमिळ लोक हिंदी वेगानें शिकत आहेत. त्यामुळें हिंदींतल्या चांगल्या-चांगल्या ग्रंथांचा तमिळमधें अनुवाद होत आहे. परंतु तमिळ ग्रंथांचा आपल्याला पत्ता च नाहीं.

आम्ही त्यांची भाषा शिकत नाहीं आणि ते च फक्त आमची भाषा शिकतात असें च चालू राहिले तर इंग्रजीच्या बाबतींत जशी विरोधी भावना लोकांच्या मनांत उत्पन्न झाली तशी भावना हिंदीच्या बाबतींत पुढें उत्पन्न होईल. आज हिंदी भाषेच्या ज्ञानाच्या बाबतींत तुमच्यांतल्या अगदीं सामान्य माणसाची बरोबरी करण्यासाठीं दक्षिणेकडील मोठ्या माणसाला पांच-पांच दहा-दहा वर्षें मेहनत घ्यावी लागते. हें बरोबर नाहीं. यासाठीं आपल्या भाषेच्या व्याकरणांत अखिल भारतीय भाषांच्या दृष्टीनें सुधारणा केली पाहिजे. म्हणून माझें म्हणणें आहे कीं, त्यांची भाषा आपण शिकूं लागलों कीं त्यांच्या अडचणींची आम्हांला कल्पना येईल; आणि आमचें मन हिंदीमधें सुधारणा करायला अनुकूल होईल.

भाषा शिकण्याची ही गोष्ट मी सक्तीची करूं इच्छित नाहीं. कारण हें सर्व प्रेमानें झालें पाहिजे. काशी आणि प्रयाग येथें दक्षिणेंतले कितीतरी लोक राहतात. त्यांच्याशीं आपला संबंध आला पाहिजे. आणि वाढला पाहिजे, यानें त्यांना हि बरें वाटेल आणि आपला हि लाभ होईल. वेलोर जेलमधें पाऊल टाकतां च

मीं तमिळ शिकायला सुरवात केली. लोकांना आश्चर्य वाटलें. तिथें दक्षिणेंतल्या चारी प्रांतांतले लोक होते. पण ते आपआपसांत इंग्रजींत च बोलत. मीं तमिळ शिकायला सुरुवात केल्यावर माझे तमिळ भाषेचे गुरुजी म्हणाले कीं 'तुम्ही या जेलमधें येऊन तमिळची प्रतिष्ठा वाढविली' दक्षिणेकडील लोकांच्या अंतःकरणांत माझ्याविषयीं जें प्रेम आणि श्रद्धा दिसून येते त्याचें श्रेय कांहीं अंशीं माझ्या तमिळ-प्रेमाला हि आहे.

: ६ :

## भूमिक्रांतीची मूर्ति

**प्रश्न**:—तुम्ही म्हणाला कीं इथें भूमि-क्रांति होईल. तर त्याचें स्पष्ट दर्शन, स्पष्ट चित्र कसें असेल ?

**उत्तर**:—या बाबतींत मी तूर्त बोलूं इच्छित नाहीं. तें चित्र तुम्ही शोधून काढूं शकतां. तें तुमचें काम आहे. आंत डुबकी मारून शोधून काढा. माझी एक श्रद्धा आहे ती मीं तुमच्यापुढें मांडली. मला सुचली नाहीं अशी एखादी गोष्ट कदाचित् तुम्हांला सुचेल. एका च वैज्ञानिकाला किंवा एका च दार्शनिकाला च सर्व दर्शन होत नसतें. दुसऱ्याला हि आणखी दर्शन होऊं शकतें. भूदानाचें पूर्ण दर्शन मला च झालें आहे असें मी म्हणूं शकत नाहीं. दुसऱ्यांना हि त्याचें दर्शन होऊं शकेल. म्हणून तुम्ही च विचार करून कल्पनेनें तें शोधून काढा. प्रत्येकाची विचार करण्याची तऱ्हा वेगवेगळी असते. ब्रह्मवादी म्हणतो कीं 'सर्वत्र ब्रह्म एक आहे' तो एवढें च सांगतो. परंतु सगुण चिंतन करणाऱ्यांच्या पांच-पन्नास

प्रकारच्यां देवता असतात. कोणी एकमुखी कोणी पंचमुखी. कोणी हत्तीच्या तोंडाची, कोणी चार हातांची, कोणी आठ हातांची, अशा त्यांच्या अनेक देवता असतात. ही सर्व साहित्यिकांची सृष्टि आहे. म्हणून तुम्ही च पहा आणि पाहिजे तें रूप भूदानाला द्या.

: ७ :

# 'दान' शब्द कां वापरतां

**प्रश्न** :—दान शब्दाचा उपयोग तुम्ही कां करतां ?

**उत्तर** :—शब्दांचा एक महिमा असतो. दान हा मोठा पवित्र शब्द आहे. सामान्य लोक शब्दाकडे रूढ अर्थानें च पाहतात. परंतु जे प्रतिभावान कवि असतात, ते शब्दांच्या रूढ अर्थाकडे लक्ष न देतां, मूळ अर्थाकडे लक्ष देतात. मूळ अर्थाकडे पाहिलें तर दानाचा अर्थ 'उपकार' असा नसून '**दानं सं विभागः**' असा शंकराचार्यांनीं दानाचा अर्थ सांगितला आहे. '**सम्यक् विभाजन**' हा अर्थ आचार्यांनीं आपल्या च डोक्यांतून काढला असें नसून त्यांच्यापूर्वीं हि दानाचा तो अर्थ होता. बुद्ध भगवानांबद्दल त्यांच्या शिष्यांनीं एक गोष्ट सांगितली आहे. ते म्हणतात ज्याला आपण 'दान' म्हणतों त्याला भगवान बुद्ध 'समविभाग' म्हणत. '**यं संविभागं भगवाअवण्णी**' परंतु बुद्ध भगवानांपूर्वीं हि वेदांत हा उल्लेख आला आहे.वेदांच्या भाष्यकारांनीं लिहिलें आहे कीं '**दानं समविभागः**'—दान म्हणजे सतत देत राहणें. आज आपण घेत च राहतों. परंतु परमेश्वरानें आपल्याला दान देण्यासाठीं हात दिले आहेत. '**हाथ दिये कर दान रे**'—हात हिसकून घेण्यासाठीं नाहींत. हिसकून घ्यायला दांत आणि नखें पुरेशीं आहेत. म्हणून आपण हाताकडून हिसकावून

घेण्याचें काम घेतलें तर परमेश्वर आपल्याला पुढच्या जन्मीं चतुष्पाद प्राणी बनवील. म्हणून हात ही परमेश्वराची मनुष्याला फार मोठी आणि पवित्र देणगी आहे, असें समजलें पाहिजे.

**'दानेन पाणिर्नतु कंकणेन'** हाताला शोभा दानानें येते कंकणानें येत नाहीं. याचा अर्थ असा कीं, हात संग्रहानें शोभत नसतो, दानानें शोभतो. म्हणून सतत देत राहिलें पाहिजे. गीतेनें सांगितलें आहे कीं, यज्ञ, दान आणि तप ह्या तीन क्रिया सतत चालल्या पाहिजेत. दानाचा अर्थ 'दोनेशन' असा नाहीं. दानाचा अर्थ 'धर्म' असा आहे. हिंदुस्थानांत 'दान करा' म्हणण्याऐवजीं 'धर्म करा' असें हि म्हटलें जातें. याचा अर्थ 'धर्म' आणि 'दान' हे पर्यायवाची शब्द आहेत, एका च अर्थाचे शब्द आहेत. आज त्या शब्दांचा भलता च अर्थ रूढ झाला आहे. परंतु तो शब्द मुळांत तसा नाहीं. किती तरी चांगले शब्द आज बिघडलेले आहेत. वैराग्य शब्द च घ्या. कुणी आपल्या बायकोवर रागावून घर सोडून निघून गेला तर त्यांस वैराग्य आलें असें म्हणतात. रागावून घर सोडणें हें काय वैराग्याचें लक्षण झालें ? अशा रीतीनें आम्हीं चांगल्या शब्दांना भ्रष्ट केलें आहे. आपल्या भाषेंतील उत्तम शब्द म्हणजे आपलीं शस्त्रें आहेत. तीं आपण गमावतां कामा नये. आपल्याजवळ जें कांहीं आहे तें देणें म्हणजे 'दान'. आपल्याजवळ जें काय आहे तें सोडणें, त्याचा त्याग करणें म्हणजे 'यज्ञ'. अशा रीतीनें यज्ञ आणि दान या दोन्ही प्रक्रिया समाजांत नेहमीं चालत राहिल्या पाहिजे.

# साहित्यिकांचें देशाला आवाहन

गांधीजींनी सुरू केलेल्या अहिंसक क्रांतीमुळें आमच्या देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळालें. आचार्य संत श्री विनोबा भावे यांनीं सुरू केलेली सर्वोदय-यात्रा म्हणजे त्या च अहिंसक क्रांतीचें पुढचें स्वाभाविक पाऊल आहे. परंतु नवीन समाज-रचना कशा प्रकारची असावी या प्रश्नाचें उत्तर अजून हि आपल्याला सापडलें नाहीं. समता आणि सामाजिक न्याय हें त्या भावी समाजाचें लक्ष्य आहे. परंतु तें प्राप्त करून घेण्यासाठीं आपण जर हिंसक साधनांचा आश्रय घेतला तर गांधीजींनीं दाखवून दिलेली आपली भारतीय अहिंसक संस्कृतीची परंपरा टिकणार नाहीं. या उलट आपला मार्ग निश्चित करून त्यावर ताबडतोब उत्साहपूर्वक चालू न लागलों तर आपण निष्क्रीय आणि गाफिल बनूं आणि त्या योगानें हिंसेच्या भोवऱ्यांत सांपडूं. अशावेळीं विनोबांनीं जें कार्य आरंभिलें आहे त्याकडे आम्ही मोठ्या आशेनें व उत्साहानें पाहत आहोंत. हा मार्ग आपण ताबडतोब स्वीकारावा असें हि आम्हांला वाटतें कारण यांतून च आपल्याला जरूर ते नवनवीन मार्ग सांपडत जातील.

म्हणून आमची विनति आहे कीं देशानें विनोबांच्या या महान प्रयत्नाला आपला हार्दिक आणि सक्रीय सहकार द्यावा. त्यायोगानें अहिंसक क्रांतीचे सर्व टप्पे आपण शांतिपूर्वक गांठूं शकूं. अहिंसक मार्गानें राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून ज्या प्रमाणें आपण जगासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे त्या च प्रमाणें समत्व आणि सामाजिक न्याय यावर आधारलेल्या नव्या समाजाची रचना करून आपण जगाला हें दाखवूं शकूं कीं ज्या समतेच्या स्थापनेसाठीं रक्त पाताची प्रक्रिया आवश्यक समजली जाते ती समता आपण शांति, प्रेम आणि अहिंसा या मानवीय आणि श्रेष्ठ मार्गानें च प्राप्त करूं शकतों.

विशेषे करून आमच्या पत्रकार बांधवांना आमची खास विनंति आहे कीं बातम्या लेख अभिप्राय इत्यादि द्वारा त्यांनीं देशांत अहिंसक क्रांतीच्या प्रगतीला व यशाला मदतरूप होईल असें वातावरण निर्माण करावें.

**विनीत**

| | |
|---|---|
| **मैथिलीशरण गुप्त** | **सियारामशरण गुप्त** |
| **महादेवी वर्मा** | **बृन्दावनलाल वर्मा** |
| **रामाधारी सिंह "दिनकर"** | **गंगाप्रसाद पाण्डेय** |
| **राय कृष्णदास** | **बाबा राघवदास** |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकृत.

REFBK-0009279